February 11, 2026

| | |
|---|---|
| Listing Department<br>BSE Limited<br>Phiroze Jeejeebhoy Towers<br>Dalal Street<br>Mumbai – 400 001 | Listing Department<br>National Stock Exchange of India Limited<br>Exchange Plaza, Bandra Kurla Complex,<br>Bandra (East)<br>Mumbai – 400051 |
| **Scrip Code: 543223** | **Name of Scrip: MAXIND** |

**Sub: Newspaper publications of Un-audited Financial Results for the quarter and nine months ended December 31, 2025.**

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements), Regulations 2015, please find enclosed copies of newspapers advertisements published on February 11, 2026 in the columns of English daily "Mint", all editions, and Marathi daily "Navakal", Mumbai edition with respect to Un-audited financial results of the Company for the quarter and nine months ended on December 31, 2025.

You are requested to kindly take the aforesaid on record.

Thanking you,

Yours faithfully,
For **Max India Limited**

TRAPTI Digitally signed by TRAPTI Date: 2026.02.11 12:49:44 +05'30'

**Trapti**
**Company Secretary & Compliance Officer**

Encl.: As above

# 400 million calls daily: Trai mulls tougher spam rules

Jatin Grover
jatin.grover@livemint.com
NEW DELHI



With telecom operators now blocking or flagging nearly 400 million suspected spam calls and messages every day, India's telecom regulator is looking to widen its current enforcement framework alongside a willingness to tighten the rules if gaps persist, while moving toward a full rollout of a digital consent system for commercial communications.

In an interview with *Mint*, Anil Kumar Lahoti, chairman of the Telecom Regulatory Authority of India (Trai), said the regulator is reviewing the existing framework governing telemarketers to identify areas where responsibilities are not being met, and is open to strengthening the rules if required. Lahoti also said Trai is moving toward a full rollout of the Digital Consent Acquisition (DCA) framework, beginning with banks, after pilot results showed the system worked technically. Lahoti, who completed two years in office last month, added that recommendations for the next spectrum auction have entered the final stages and are expected to be submitted to the Centre within a month.

*Edited excerpts:*

**How is the regulator checking the spread of spam?**

Trai has taken many measures to reduce the number of unsolicited commercial communication over the last year and a half. The commercial communication today is taking place through registered telemarketers. Currently, every commercial call or message is scrubbed against the customer's preference register. As a result, approximately 75 million calls or SMS are blocked daily.

In addition, telecom operators are also flagging spam to users coming from 10-digit phone numbers to the tune of about 320 million a day, as per December data. So overall, about 400 million spam calls and messages are either being blocked or flagged on a daily basis.

INTERVIEW

**What are the main challenges in curbing spam?**

Trai has its DND (Do Not Disturb) App that lets users register their mobile number under DND to avoid unwanted commercial or telemarketing calls.

However, the challenge is that of the 1.16 billion mobile subscribers, only 220 million have registered their preference on the DND platform. This means that about 80% of users are still open to receiving unwanted calls. The regulator is making efforts to educate consumers on the same.

**What is Trai's stance on regulating telemarketers through a separate authorization?**

It won't be correct to say that telemarketers are not regulated today. Telemarketers are regulated through Distributed Ledger Technology (DLT) platform. No telemarketer can engage in commercial communication unless they are authorized on this platform.

Having said that, Trai is actively engaged with stakeholders to identify specific gaps where responsibilities by telemarketers are not being met. If the current rules prove insufficient, the regulator is open to strengthening the existing TCCCPR (Telecom Commercial Communications Customer Preference Regulations) to fix responsibilities.

> Only 220 million of the 1.16 billion mobile subscribers have registered their preference on the DND platform
> **Anil Kumar Lahoti**
> Chairman, Trai

**Does that mean Trai is not moving ahead with a separate authorization regime for telemarketers?**

We are engaged with telecom operators and telemarketers to identify any gaps and issues. We will take appropriate action accordingly.

**What is the current status of user consent framework for commercial communication?**

The new Digital Consent Acquisition (DCA) framework aims to make consent for all promotional calls and SMS digital and visible to the consumer. They will have control to revoke these consents. A pilot to seek user consent for these commercial communications was conducted with telecom operators and 11 banks, and the results showed that the system worked fine technically. The regulator is now moving toward a complete rollout for these entities and will involve the Indian Banking Association (IBA).

**How is Trai handling legacy consents already given by users?**

Banks hold a lot of legacy consents. To manage this transition without starting from zero, the regulator is allowing these entities to upload existing consents to the digital platform based on their own certification.

The regulator decided against notifying every consumer because sending crores of notifications would itself create a massive spam event. Since consumers are already receiving messages based on these consents, the status quo is maintained, but the data is digitized for better management. However, users will be able to check their legacy consent and revoke the same once the data is uploaded to the DLT platform.

**Have discussions taken place with banks on fraud prevention?**

Yes, extensive discussions have taken place. As a result, banks as principal entities were required to whitelist thousands of URLs. Now, any SMS containing a URL that has not been whitelisted by the bank is blocked. Additionally, banks must ensure that any telemarketer sending messages on their behalf is strictly authorized and part of a traceable chain.

From now onwards, all the service and transactional calls, such as OTPs, balance alerts, or important notifications, from banks, insurance companies, and mutual funds will originate from the 160 series numbers, while all telemarketing calls will continue to originate from the 140 series. This will help users identify genuine calls.

*For an extended version of this story, go to* livemint.com.

# Netflix's Hollywood edge heats up India OTT rivalry

Lata Jha
lata.j@htlive.com
NEW DELHI



Netflix has recently struck a deal to stream all films produced by Sony Pictures Entertainment globally after their theatrical release.

With Netflix recently striking a deal to stream all films produced by Sony Pictures Entertainment globally after their theatrical release—and potentially moving to acquire the massive Warner Bros library—the niche, urban, English-language OTT space in India is bracing for a significant shake-up.

As global catalogues consolidate under fewer platforms, industry experts believe these international shifts will fundamentally alter consumer choices in India, forcing rivals like Prime Video and JioHotstar to rethink their strategies for targeting up-market, premium users. The clustering of global libraries reduces friction for consumers tired of navigating multiple subscriptions.

While Netflix moves toward a dominant position, Prime is fighting back with an "add-on" strategy. It recently onboarded Moviesphere+, a subscription-based platform from Lionsgate that offers heavyweights like *The Hunger Games: The Ballad of Songbirds and Snakes*, *Mad Men*, *Borderlands*, *P.S. I Love You*, *The Princess Bride* and *Jackie Brown*.

"English OTT content has demand, but Indian market doesn't yet have a single, unified leader in that mode. Netflix is the closest, but it shares space with Prime Video, HBO (via Discovery and Warner ties that stream on JioHotstar) and others like MUBI," said Charu Malhotra, co-founder and MD, Primus Partners, a management consultancy firm.

"Many consumers pick and mix based on price, a few must watch shows or trial periods. If global catalogues get consolidated under fewer platforms, it reduces friction for consumers who want one home for the shows they love," she added.

Malhotra said such consolidation may alter how Indian rights deals are structured. "It may also change how deals are struck for Indian rights, if Netflix has first dibs globally, that puts pressure on free or low-price licensing models."

> Catalogue consolidation may reshape premium OTT, forcing Prime Video, JioHotstar to tweak strategy

"So yes, a structural change is possible. But it will probably be gradual. Even if one platform gets stronger catalogue control, others will fight on price, bundles (telco ties) and specialized content," she added.

Industry experts argue that leadership in the English OTT space will depend not just on catalogue size but clarity of positioning.

A platform that becomes the obvious "home for Hollywood, plus global hits" could capture urban subscriptions, forcing rivals to double down on differentiation—whether through exclusives, regional depth, pricing strategies or curated experiences.

Berjesh Chawla, managing director and lead (communications, media & technology), Accenture in India, said the English OTT category functions differently from mass-language streaming.

"Consumption is concentrated in urban markets and driven by long-running franchisees, making it a depth-driven category rather than a reach-driven one," he said. "Platforms that can own, organize and consistently serve these franchisees in one place are best positioned to lead the English OTT space."

For consumers, the most visible impact may come through packaging and pricing. A platform that establishes itself as the "home of Hollywood" could justify premium pricing or higher subscription tiers. However, competitive pressures are likely to keep prices in check.

Prime Video and JioHotstar could respond with bundled offerings or discounts, particularly through telecom partnerships. This could include flexible pricing options or combinations of verticals—such as sports paired with English films, or premium global catalogues bundled with television subscriptions.

*For an extended version of this story, go to* livemint.com.

# Zappfresh's Meevaa Foods crosses 5,000 orders within 48 hours of launch




*Deepanshu Manchanda, founder & director, Zappfresh, and Prreya Aggarwal, director, Zappfresh, with the newly launched Meevaa Foods products.*

Zappfresh (DSM Fresh Foods Ltd.), a trusted fresh and frozen food brand, has received an encouraging response to its newly launched frozen vegetarian snacks brand, Meevaa Foods, with over 5,000 orders placed within the first 48 hours of its launch in Delhi NCR.

Launched on February 6, Meevaa Foods marks Zappfresh's entry into the frozen ready-to-eat and ready-to-cook vegetarian segment. The strong first-day traction reflects growing consumer demand for hygienic, convenient and restaurant-quality frozen food options made with clean ingredients and global safety standards. Meevaa Foods debuted with a curated range of 12 frozen vegetarian products including *samosas*, momos, kebabs, patties, *tikkis*, spring rolls, and gravies. The products are manufactured at export-certified facilities and blast-frozen at minus 18 degrees to preserve taste, texture, and freshness, while ensuring food safety.

Prreya Aggarwal, Director at Zappfresh said, "The first-day response to Meevaa Foods has been extremely encouraging and validates our belief that consumers are ready for high-quality frozen foods they can trust. Crossing 5,000 orders within 48 hours of the launch reinforces the demand for export-grade, clean-label frozen products in the Indian market. This early momentum gives us confidence as we scale Meevaa Foods across cities. With better cold-chain infrastructure and evolving food habits, we see strong long-term potential for frozen foods that combine safety, consistency and great taste."

mint Brand Studio
Zappfresh

The frozen food range, already exported to markets such as the USA, Canada, and Saudi Arabia, is now being introduced to Indian consumers with the same quality and safety benchmarks. All Meevaa Foods products are free from MSG, preservatives, additives, and artificial food colouring, and are certified by FSSAI (Food Safety and Standards Authority of India), USFDA (United States Food and Drug Administration), HACCP (Hazard Analysis Critical Control Points), Halal, and BRCGS (Brand Reputation through Compliance Global Standards).

Meevaa Foods products are currently available across Delhi NCR and will expand to Mumbai and Bengaluru from March 1. Zappfresh plans to continue expanding the Meevaa Foods portfolio every quarter while investing ₹10 crore over the next two to three years to strengthen its frozen food operations and processing capabilities.

With this launch, Zappfresh continues to build its presence in value-added food categories, focusing on scalable brands backed by strong food technology, quality control, and reliable supply chains.

**Product Range**

The initial pilot portfolio includes 12 products that are prepared using a combination of advanced food technology and traditional methods, with hand-filled items like momos and samosas to ensure portion quality. Meevaa Foods is available through online channels and select retail partners, with plans to expand the product portfolio quarterly based on consumer feedback and category growth. DSM Fresh Foods has allocated ₹10 crore over 2–3 years to scale frozen food operations, strengthen processing infrastructure, and broaden distribution.

***Created by Mint Brand Studio***

**Max India Limited**
MAX INDIA LIMITED
CIN:L74999MH2019PLC320039
Registered Office: Plot-167, Floor 1, Ready Money Mansion, Dr. Annie Besant Road, Worli, Mumbai, Maharashtra, India, 400018
Website: www.maxindia.com

**Statement of unaudited financial results for the quarter and nine months ended December 31, 2025**

The Board of Directors of the Company, at the meeting held on February 10, 2026, approved the unaudited financial results of the Company, for the quarter and nine months ended December 31, 2025.
The results are available on the Stock Exchange websites, www.nseindia.com and www.bseindia.com, and on the company's website (URL: https://www.maxindia.com/static/uploads/stakeholder/outcomebmfinancialresultsq326.pdf). The same can be accessed by scanning the Quick Response Code provided below.

By Order of the Board
For **Max India Limited**
**Sd/-**
**Rajit Mehta**
**Managing Director**
**DIN: 01604819**

Place: Gurugram
Date: February 10, 2026

***Note: the above intimation is in accordance with Regulation 33 read with Regulation 47(1) of the SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015***

dholera — A NEW ERA
**Dholera Industrial City Development Limited**

Tenders are invited from reputed and experienced agencies for the following. The salient features, eligibility criteria and prescribed formats for submission of tender are available at the procurement portal link: **dicdltender.nprocure.com,** as mentioned in below table, as amended from time to time including time extension, if any.

**TENDER NOTICE**

| Sr. No. | Description | Bid Due Date (Online) |
|---|---|---|
| 1 | RFQ cum RFP for "Augmentation of Existing 20 MLD Common Effluent Treatment Plant (CETP) and associated works in DSIR, Dholera" | **02.03.2026 up to 15:00 Hrs** |
| **Physical Bid Submission : Within 07 days from the Online Bid Due Date** | | |

The Tender submission shall be accompanied with the requisite Tender Fee, EMD, Forms, supporting documents, etc. as required in the Tender Document.
**The Tender submission must be addressed to : Managing Director - DICDL.**
6th Floor, Block No. 1 and 2, Udyog Bhavan, Sector-11, Gandhinagar-382011, Gujarat, India. **Phone : +91 - 079-29750500 CIN : U45209GJ2016SGC085839**
**Email : tender@dicdl.in**

noida
**New Okhla Industrial Development Authority**
Administrative Building, Sector - 6, Noida - 201301 (U.P.)
Website : www.noidaauthorityonline.in

**E-TENDER NOTICE**

E-Tender are invited from firms/contractors registered with UPLC Lucknow for the following jobs against which bids can be uploaded and same shall be opened/downloaded as per schedule mentioned. The details and conditions of all tenders are available on NOIDA Authority's official website: www.noidaauthorityonline.in & https://etender.up.nic.in. Please ensure to see these websites for any changes/amendments & corrigendum etc.

1. **09/S.M.-JAL-I/E.T./2025-26,** Strengthening of Water Supply (S/I/T/C of Cloud Based Remote Monitoring & Management system Integrated with Energy Conservation Device & PLC Based, CBR-MMS Integratable Centralized Automatic Bacteriological Treatment Plant for Treatment of Water as per BIS Standards Vide IS:10500-2012 in Water Supply Network of of Sector-14A, 15A, & 16A & Setting-UP of Centralized CBR-MMS-Monitoring Cell with OP & Mnt for the Period of 5 Years), Noida. Cost Rs. 180.98 Lacs.

**Which can be uploaded by date: 17.02.2026 upto 5:00 PM. Pre-qualification shall be opened/downloaded on date:- 18.02.2026 at 11:00 AM.**

**Office**
**Sector-5, Noida**
**General Manager (Jal)**
**Noida**

**CLEAN, GREEN, SAFE & SECURE NOIDA**

noida
**New Okhla Industrial Development Authority**
Administrative Building, Sector - 6, Noida - 201301 (U.P.)
Website : www.noidaauthorityonline.in

**E-TENDER NOTICE**

E-Tender are invited from firms/contractors registered with UPLC Lucknow for the following jobs against which bids can be uploaded and same shall be opened/downloaded as per schedule mentioned. The details and conditions of all tenders are available on NOIDA Authority's official website: www.noidaauthorityonline.in & https://etender.up.nic.in. Please ensure to see these websites for any changes/amendments & corrigendum etc.

**(A) 1. 18/GM(E/M)Sr.M(E/M)-IV/2025/26,** Providing 11 KV Feeder Line from 33/11KV Sub-Station Sector-168 to Sector-161, Noida. Cost Rs. 283.06 Lacs.

**Which can be uploaded by date: 17.02.2026 upto 5:00 PM. Pre-qualification shall be opened/downloaded on date:- 18.02.2026 at 11:00 AM.**

**Office**
**Sector-5, Noida**
**General Manager (E&M)**
**Noida**

**CLEAN, GREEN, SAFE & SECURE NOIDA**

noida
**New Okhla Industrial Development Authority**
Administrative Building, Sector-6, Noida-201301(U.P.)
Website : www.noidaauthorityonline.in

**E-TENDER NOTICE**

E-Tenders are invited from eligible contractors/firms for the following jobs against which bids can be uploaded and same shall be opened/downloaded as per schedule mentioned. The details and conditions of all tenders are available on Noida Authority's official website: www.noidaauthorityonline.in & https://etender.up.nic.in. Please ensure to see these websites for any changes/ amendments & corrigendum etc.

| S.No | Job No. | Name of work | Amount (Rs.) | Publishing |
|---|---|---|---|---|
| 1 | 26/GM/PE (PH-I)/ E-T/ 2025-26 | Providing & Fixing of Dog feeding point Board for various location in PH-1 Area Noida | Tender Amount Rs. 11758231.81 Tender Fee Rs. 5310/-EMD Amount Rs. 2,83,000/- | 2nd Time |

The above tenders can be uploaded from dated 11.02.2026 to 17.02.2026 upto 5.00 PM. The Pre-Qualification shall be opened / downloaded on dated 18.02.2026 at 11.00 AM.

**General Manager**
**(Public Health)**
**Noida**

CLEAN, GREEN, SAFE & SECURE NOIDA

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

१०३ शतकोत्तर वाटचाल

• मुंबई, बुधवार ११ फेब्रुवारी, २०२६ • वर्ष-१०३, अंक-३३८, पाने-८, किंमत : ₹ ६ NAVAKAL

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 103, Issue - 338 Marathi - Daily - Mumbai, 11 February , 2026 Page- 8 Price- Rs. 6/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ!

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews


# एका राजकीय सल्लागाराचे कोट्यवधीचे कंत्राट अजित पवार रद्द करणार होते! विदर्भातील नेत्याच्या फाईलवर सही करायला ते थांबले

## अजित पवारांचा घातपात झाला! रोहित पवारांनी संशय उपस्थित केला

■ मुंबई

**ज्या व्हीएसआर** कंपनीच्या विमानातून अजित पवारांनी अखेरचा प्रवास केला ते विमान दुरुस्त होते का, त्या विमानाचे पायलट कपूर यांनी मद्यपान केले होते की नाही, मुंबई विमानतळावरील उड्डाणाच्या वेळचे सीसीटीव्ही फुटेज तपासले आहे का, सुरक्षित अशा २९ नंबरच्या धावपट्टीवर विमान न उतरवता ते ११ नंबरच्या धोकादायक धावपट्टींवर उतरवण्याचा प्रयत्न का केला, ऐनवेळी २ वैमानिक का बदलण्यात आले, वैमानिकांनी मेडेची सूचना का दिली नाही, विमानातील संपर्क यंत्रणा बंद का होती, विमानात पेट्रोलचे कॅन ठेवले होते का




असे सवाल विचारत रोहित पवार यांनी मागणी केली की, अजित पवार यांच्या अपघाताची चौकशी झालीच पाहिजे. ही चौकशी फ्रान्स, अमेरिका आणि युके येथील कंपन्यांमार्फत करावी आणि ही चौकशी पूर्ण होईपर्यंत व्हीआरएस कंपनीची सर्व उड्डाणे स्थगित करावीत, अशी मागणीही रोहित पवार यांनी केली.

रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत म्हटले की, दादा नेहमी घड्याळ घालायचे, ते घड्याळ १५ मिनिटे पुढे ठेवायचे, ते घड्याळ मी बघितले. त्यामुळे

अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार यांनी आधीच जाहीर केल्याप्रमाणे दुखवट्याचे १३ दिवस उलटल्यानंतर आज मुंबईत पत्रकार परिषद घेऊन अजित पवार यांचा घातपात करण्यात आला, असे ठाम विधान केले. हा घातपात कशामुळे झाला? हा प्रश्न निर्माण झाला आहे. रोहित पवार यांनी सांगितले की, अजित पवार हे गाडीने मुंबईहून निघणार होते. मात्र त्या दिवशी पूर्व विदर्भातील एका नेत्याच्या फाईलवर सही करायची होती. ती फाईल मंत्रालयात होती. ती मागवून त्यावर सही करेपर्यंत वेळ झाल्याने त्यांनी गाडीने न जाता दुसऱ्या दिवशी सकाळी विमानाने बारामतीला जाण्याचा निर्णय घेतला. हा अजित पवारांच्या पक्षातील विदर्भातील नेता कोण? याबद्दल आता चर्चा सुरू झाली आहे. त्याचबरोबर रोहित पवार यांनी अत्यंत महत्त्वाचा संशय व्यक्त केला. ते म्हणाले की, गेले काही महिने मी सतत अजित पवार आणि सरकारी अधिकाऱ्यांबरोबर होतो. यावेळी अजित पवार हे एका मोठ्या राजकीय सल्लागाराचे कोट्यवधीचे कंत्राट रद्द करण्याच्या तयारीत होते. यातूनच अजित पवार यांचा घातपात करण्यात आला का? हा प्रश्न या वाक्यातून उपस्थित होतो. आपल्या आयुष्याला धोका आहे याची कुणकुण अजित पवारांना लागली होती का? रोहित पवारांनी सांगितले की, पाण्याच्या प्लास्टिकच्या बाटलीत काहीही मिसळले जाऊ शकते. यामुळे गेले काही महिने अजित पवार हे प्लास्टिकच्या बाटलीतून पाणी न पिता काचेच्या बाटलीतून पाणी पिऊ लागले होते. हे पाणीही आधी तपासून सुरक्षा रक्षकाच्या हाती दिले जायचे. अजितदादांनी हा बदल का केला होता? असा प्रश्न रोहित पवारांनी विचारला. स्वत:चे विमान घ्या आणि त्यातूनच प्रवास करा, हेही अजितदादा मला वारंवार सांगत होते, असेही रोहित पवारांनी सांगितले.




जे झाले नाही असे तुम्हाला वाटते ते दुर्दैवाने घडले आहे. अजित दादांच्या प्रेमापोटी आम्ही ही माहिती गोळा केली. खरे काय घडले ते माहीत व्हावे हा यामागचा उद्देश आहे.

मुंबई ते बारामती हे २१० किलोमीटर अंतर २७ मिनिटांत लेअरजेट विमानाने जायचे होते. हे वेगाने व उंचीवरून जाणारे विमान आहे. दादा डावीकडे बसले असावे. मागच्या बाजूला सामान असते. तिथे पेट्रोलच्या टाक्या असतात. हे विमान १६ वर्षे जुने आहे. विजयकुमार व रिमी सिंग हे कंपनीचे मालक आहेत. विजयकुमार


पान ३ वर


## चंद्रपुरात काँग्रेस नेते आपसात भांडत बसले भाजपाने उबाठाला घेऊन महापौर बसवला

■ चंद्रपूर

**चंद्रपूर** महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर निर्माण झालेल्या त्रिशंकू अवस्थेमुळे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या सत्तानाट्याचा आज अत्यंत नाट्यमयरित्या शेवट झाला. चंद्रपूरच्या महापौरपदी भाजपाच्या संगीता खांडेकर तर उपमहापौरपदी प्रशांत दानव यांची निवड करण्यात आली. समान मते पडल्याने दानव यांची निवड ईश्वर चिठ्ठीद्वारे झाली. काँग्रेसच्या दोन गटांच्या भांडणाचा पुरेपूर फायदा उठवत भाजपाने उबाठाशी संधान बांधून चंद्रपूरमध्ये सत्तास्थापन केली. त्याचे पडसाद उमटून महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या युतीमुळे भाजपा आणि उबाठा दोन जुने राजकीय मित्र पुन्हा एकत्र आल्याने त्याची महाराष्ट्राच्या राजकारणात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

आज झालेल्या महापौर-उपमहापौरपदाच्या निवडणुकीत भाजपाच्या सुजाता खांडेकर यांना ३२ मते मिळाली, तर काँग्रेसच्या महाडोळे यांना ३१ मते पडली. मतदानावेळी वंचितचे २ सदस्य अनुपस्थित राहिले, तर एमआयएमच्या एका सदस्याने मतदानात भाग घेतला नाही. उपमहापौर पदासाठी झालेली निवडणूक आणखी रंगतदार झाली. उबाठाने यासाठी सकाळीच पक्षात दाखल झालेल्या प्रशांत दानव यांना उमेदवारी दिली. काँग्रेसकडून पप्पू देशमुख यांनी अर्ज दाखल केला. दोघांनाही प्रत्येकी ३२ मते पडली शेवटी ईश्वरचिठ्ठीचा आधार घेण्यात आला आणि


पान ५ वर


## लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव

■ नवी दिल्ली

### ११८ खासदारांच्या सह्या

**संसदेत** विरोधकांनी लोकसभाध्यक्षांविरोधात आक्रमक भूमिका घेत लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला. आज सचिवालयात त्याची नोटीस देण्यात आली. काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांनी सांगितले की, सभापतींना पदावरून हटवण्यासाठी संविधानाच्या कलम ९४(सी) अंतर्गत लोकसभा सचिवालयाला नोटीस देण्यात आली आहे. या नोटिशीवर काँग्रेस, राजद, द्रमुक आणि समाजवादी पक्षासह विविध विरोधी पक्षांच्या ११८ खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. मात्र तृणमूल काँग्रेस खासदारांनी या नोटिशीवर स्वाक्षऱ्या केलेल्या नाही.

या नोटिशीमध्ये म्हटले आहे की, लोकसभाध्यक्ष सातत्याने विरोधी खासदारांना जनहिताचे मुद्दे मांडण्यापासून रोखत आहेत. सभापती उघडपणे पक्षपाती वर्तन करत आहेत. विरोधी


पान ७ वर


## मोदींच्या भीतीपोटी गर्दी! रटाळ भाषण कोण ऐकणार सरसंघचालक भागवतांवर राज ठाकरेंची टीका

■ मुंबई

**राष्ट्रीय** स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त मुंबईतील नेहरू सेंटर येथे सरसंघचालक मोहन भागवत यांनी भाषिक आंदोलनांना आजार संबोधले. त्यावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज त्यांच्यावर पोस्ट करीत सडकून टीका केली आहे. राज ठाकरे म्हणाले की, कार्यक्रमाला आलेली सर्व मंडळी तुमच्या प्रेमाखातर आली नव्हती तर ती नरेंद्र मोदी यांच्या सरकारी भीतीमुळे आली होती. नाहीतर आजवर का कोणी या असल्या रटाळ प्रवचनांना आले नाहीत? त्यामुळे ती मंडळी आपल्यासाठी आली होती या गैरसमजातून प्रथम आपण



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

बाहेर या. संघाच्या कामाबद्दल आमच्या मनात आदर आहे, पण म्हणून अप्रत्यक्ष राजकीय भूमिका घेण्याच्या भानगडीत पडू नये. देशभरात हिंदी जी मुळात राष्ट्रभाषा नाही लादणाऱ्या सरकारचे कान उपटून दाखवा आणि मग आम्हाला समरसतेच्या गोष्टी शिकवा, अशा शब्दांत राज ठाकरे यांनी फटकारले आहे.

राज ठाकरे यांनी एक्स या सोशल मीडिया साईटवर पोस्ट टाकून मोहन भागवत यांच्या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेत म्हटले आहे


पान ७ वर


## पुरंदर विमानतळासाठी जमीन अधिग्रहणाला मंत्रिमंडळाची मंजुरी

■ मुंबई

**अजित** पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या पहिल्या बैठकीत तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. पुरंदर विमानतळासाठी जमीन अधिग्रहणाला मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत माहिती दिली.

पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने हा विमानतळ होणार आहे. त्याच्या जमीन अधिग्रहणासाठी जो निधी लागणार आहे तो उभारण्यासाठी मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यासंदर्भातील प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. एकूण ९६ टक्के लोकांनी जमीन अधिग्रहणाला परवानगी दिली आहे. त्यामुळे लगेच जमीन अधिग्रहण केले जाणार आहे. ज्या लोकांची परवानगी मिळालेली नाही त्यांच्या काही कायदेशीर अडचणी दिसत आहेत. त्या आम्ही दूर करू. १ जूनपर्यंत जमीन अधिग्रहण करू असा प्रयत्न आहे. या कामासाठी सहा महिन्यांचा अवधी दिला असला तरी १ जूनपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत, असे फडणवीस यांनी सांगितले.


पान ५ वर


## पी.एम. केअर फंडबाबत प्रश्नास बंदी काँग्रेसकडून मोदी सरकारचा समाचार

■ नवी दिल्ली

**संसदेत** पीएम केअर फंडबाबत प्रश्न विचारण्यास बंदी घालण्यात आली असून, सरकारच्या या भूमिकेवर काँग्रेसने जोरदार टीका केली. संसदेत जनतेचे प्रतिनिधी असतात त्यांना जनहिताचे प्रश्न विचारण्यापासून का रोखले जात आहे, असा सवाल करत ही हुकुमशाही आहे असे काँग्रेसने म्हटले.

संसदेत पीएम केअरबाबत प्रश्न विचारले जाऊ नयेत, असे निर्देश पंतप्रधान कार्यालयाने लोकसभा सचिवालयाला दिले असून, त्यानुसार पीएम केअर फंड. पीएम राष्ट्रीय मदत निधी आणि राष्ट्रीय संरक्षण निधीबाबत कोणतेही प्रश्न




विचारण्यास मज्जाव करण्यात आला. संसदेत कोणताही खासदार या मुद्यावर प्रश्न विचारणार नाही याची विशेष काळजी घेण्यात यावी. लोकसभेची कार्यपद्धती व कामकाज नियम ४१(२) अंतर्गत तिन्ही निधींशी संबंधित प्रश्न स्वीकाराई नाहीत असे पंतप्रधान कार्यालयाचे म्हणणे आहे. काँग्रेसने सोशल मीडियाच्या माध्यमातून यावर टीकेची झोड उठवली. 'एक्स'वर चार प्रश्न उपस्थित करत काँग्रेसने सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. खासदार जनतेचे प्रतिनिधी आहेत, त्यांना जनहिताचे प्रश्न का विचारु दिले जात नाहीत? मोदी सरकार जनतेच्या पैशाचा हिशोब का देऊ इच्छित नाही? सरकार जनतेपासून काय लपवत आहे? संसद आता मोदींच्या मर्जीने चालणार का? अशा प्रश्नांचा भडीमार केला.

## वार्षिक दहा लाखांपर्यंतचे रोख व्यवहार आता पॅनकार्डशिवाय

■ नवी दिल्ली

**केंद्र** सरकारने नवीन आयकर कायदा-२०२५ च्या मसुदा नियमांमध्ये पॅनकार्डच्या अनिवार्यतेशी संबंधित बदल केले आहेत. त्यानुसार आता एका आर्थिक वर्षात १० लाख रुपयांचे व्यवहार केल्यास पॅनकार्ड देणे अनिवार्य असणार नाही. १० लाख रुपयांच्या वरील व्यवहारांसाठी मात्र पॅनकार्ड देणे अनिवार्य असेल.

सध्या बँकांमध्ये एका दिवसात ५० हजारपेक्षा जास्त रक्कम जमा करताना पॅन कार्ड नंबर देणे अनिवार्य आहे. यापुढे त्याची गरज असणार नाही. हॉटेलचे बिल भरताना पॅनकार्ड अनिवार्यतेची मर्यादाही ५० हजार रुपयांवरून १ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. हाच नियम कन्व्हेन्शन सेंटर




आणि इव्हेंट मॅनेजमेंटच्या बिलांनाही लागू असेल. तसेच मालमत्तेची खरेदी-विक्री किंवा भेटवस्तुंच्या बाबतीत ही मर्यादा १० लाखांवरून २० लाख रुपयांपर्यंत वाढवण्याची शिफारस करण्यात आली आहे.

## परीक्षेला निघालेल्या बारावीच्या विद्यार्थ्याचा लोकलमधून पडून मृत्यू

■ ठाणे

**बारावी** परीक्षेच्या पहिल्याच दिवशी आज दुर्दैवी घटना घडली. डोंबिवली येथे राहणाऱ्या सोहम कटरे या विद्यार्थ्याचा लोकल ट्रेनमधून



पडून अपघाती मृत्यू झाला. कळवा-मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान ही घटना घडली.

सोहम कटरेचे परीक्षा केंद्र कळव्यातील मनिषा विद्यालयात होते. तो लोकल ट्रेनने परीक्षेला निघाला होता. मात्र, सकाळची वेळ असल्याने लोकलमध्ये गर्दी होती. या गर्दीमुळे सोहमचा तोल जाऊन तो चालत्या लोकलमधून खाली पडल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

या अपघातात सोहमचा जागीच मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली. सोहमच्या मृत्युमुळे त्याच्या कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. तसेच, परिसरातील नागरिकांमध्येही हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर पुन्हा एकदा लोकल ट्रेनमधील प्रचंड गर्दीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## २३ फेब्रुवारीपासून अर्थसंकल्प अधिवेशन



■ मुंबई

**येत्या** २३ फेब्रुवारीपासून २५ मार्चपर्यंत राज्याचे अर्थसंकल्प अधिवेशन सुरू होणार आहे. एक महिना हे अधिवेशन सुरू राहील. ६ मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्याचा अर्थसंकल्प मांडणार आहेत. आज विधिमंडळ कामकाज समितीच्या बैठकीत हा निर्णय झाला.

## केवळ जैन व्यापाऱ्यांसाठी स्वतंत्र ॲप जितो संघटनेचा व्यवसाय वाढीसाठी पुढाकार

**जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो)ने या ९,००० हून अधिक सदस्य असलेल्या संघटनेने जगभरातील जैन बांधवांना व्यापार व व्यवसायाच्या वृद्धीसाठी एक प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यासाठी 'जितो वन वर्ल्ड' हे ॲप तयार केले आहे. या ॲपवर विक्रेता म्हणून केवळ जैन बांधवांचीच नोंदणी केली जाणार आहे. तर जैन समुदायातील सदस्य नसलेले लोक यावर केवळ खरेदीदार म्हणूनच नोंदणी करू शकतात. जैन समुदाय एकत्र आणण्याचे आणि त्यातून त्यांची ताकद वाढविण्यासाठी 'जितो' अनेक उपक्रम राबवतो. आता जैन व्यावसायिकांना एकत्र आणून त्यांचे संबंध घट्ट करणे, व्यवसाय वाढीत त्यांची एकमेकांना मदत व्हावी यासाठी हे ॲप तयार केले आहे. मार्च किंवा एप्रिलपर्यंत सर्व वैशिष्ट्यांसह ते पूर्णपणे कार्यरत होणार आहे. जैन समाज आपल्या धर्म बांधवांसाठी विशेष सतर्क राहून त्यांना मदत करीत आहे.**

■ मुंबई

**या उपक्रमाबद्दल** बोलताना जितो मिडटाऊन आणि जेपॉईंटचे मोहित जैन म्हणाले की, जैन सदस्यांसाठी जागतिक पातळीवर संबंध जोडणे सुलभ करण्यासाठी हे व्यासपीठ तयार केले आहे. याद्वारे तुम्ही जगातील कोणाशीही संपर्क साधू शकता. हे व्यासपीठ केवळ जैन लोकांसाठी असेल आणि ते व्यापार व व्यवसायावर लक्ष केंद्रित करील. याअंतर्गत विक्रेता जैन असणे आवश्यक आहे, तर खरेदीदार कोणीही असू शकतो. जैनांच्या व्यवसायांसाठी पोहोच आणि विक्री वाढवणे हे याचे उद्दिष्ट आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात व्यवहारदेखील सुलभ होतील आणि सदस्यांचा खर्च वाचण्यास मदत होईल.

या ॲपमध्ये अनेक विभाग असतील.


पान ५ वर

# कर थकबाकीदारांच्या मालमत्तेचा मुंबई पालिका लिलाव करणार?



■ मुंबई

**वारंवार** सूचना देऊनही मालमत्ता कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या वीस बड्या थकबाकीदारांना पालिकेने मालमत्ता जप्त करण्याची नोटीस बजावली आहे. नोटीस बजावल्यानंतरही मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्तेचा लिलाव केला जाईल, असा सज्जड इशारा अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांनी दिला आहे.

मालमत्ता कर हा पालिकेच्या महसुली उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत मानला जातो. निर्धारित कालावधीत कर भरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या तसेच आर्थिक क्षमता असूनही मालमत्ता कर न भरणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांना पालिकेकडून कलम २०३ अन्वये जप्तीची नोटीस बजावण्यात येते.

मालमत्ता देयके प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत मालमत्ता कर जमा करणे आवश्यक असते. तरीही कर न भरल्यास टप्पेनिहाय कारवाई सुरू करण्यात येते. अधिकारी थकबाकीदाराशी प्रत्यक्ष संपर्क आणि संवाद साधून कर भरण्यासाठी पाठपुरावा करतात. त्यानंतरही कर न भरल्यास पालिकेच्या वतीने थकबाकीदाराला डिमांड लेटर पाठविण्यात येते. पुढच्या टप्प्यात २१ दिवसांची निर्वाणीची नोटीस पाठविली जाते. त्यानंतर संबंधित मालमत्ता जप्तीची आणि लिलावाची प्रक्रिया सुरू केली जाते.

# मोरवडमध्ये शक्तिपीठला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

■ लातूर

**लातूर** जिल्ह्यातून प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध दिवसेंदिवस तीव्र होत आहे. रेणापूर तालुक्यातील मोरवड येथे आज मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी जोरदार विरोध केला. या वेळी परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. महामार्गासाठी जमिनीची मोजणी करण्यासाठी महसूल व संबंधित विभागाचे अधिकारी मोरवड येथे दाखल झाले होते. मात्र, सुपीक व बागायती जमिनीतून हा महामार्ग जाणार असल्याचा दावा करत शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना रोखले. आमच्या उपजीविकेचा आधार असलेली जमीन आम्ही कोणत्याही परिस्थितीत देणार नाही, असा ठाम पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला.

# २८ वर्षांनंतर नांदेड महापालिकेच्या महापौरपदी भाजपाच्या कविता मुळे



■ नांदेड

**तब्बल** २८ वर्षांनंतर नांदेड महापालिकेत भाजपाची सत्ता आली असून, महापौरपदी कविता मुळे तर उपमहापौरपदी दीपक रावत यांची निवड झाली. निवडणूक झाल्यानंतर भाजपा व एमआयएमचे सदस्य आमनेसामने आले आणि जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

आज झालेल्या विशेष सभेत भाजपाच्या महापौर व उपमहापौर पदाच्या उमेदवारांनी प्रत्येकी ५० मते मिळवली तर काँग्रेस आणि वंचित बहुजन विकास आघाडीला १५ मतांवर समाधान मानावे लागले. तर एमआयएमने उभ्या केलेल्या उमेदवाराला १४ मते मिळाली. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या २ सदस्यांनी तटस्थ राहण्याचा निर्णय घेतल्याने भाजपाचा मार्ग सुकर झाला. नांदेड महापालिकेत एकूण ८१ जागा असून, त्यात भाजपा ४५, एमआयएम १४, काँग्रेस १०, शिंदे सेना ४, वंचित बहुजन विकास आघाडी ५, राष्ट्रवादी अजित पवार गट ४ आणि अपक्ष १ असे पक्षीय बलाबल आहे. ही निवडणूक पार पडल्यानंतर एमआयएमचे नगरसेवक सभागृहाबाहेर आले, तेव्हा तिथे उभ्या असलेल्या भाजपाच्या सदस्यांनी, 'जय श्रीराम आणि मोदी-मोदी' अशा घोषणा दिल्या, तर एमआयएमकडून 'नारा ए-तकबीर, अल्लाह हु अकबर'च्या घोषणा देण्यात आल्या.

# घरांच्या थकीत भाडे वसुलीसाठी वैधानिक अधिकार द्या! शिवशाहीची मागणी

■ मुंबई

**घरांच्या** थकीत भाडे वसुलीसाठी वैधानिक अधिकार देण्यात यावेत, अशी मागणी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाने शासनाकडे केली आहे.

या कार्यालयातून असे सांगण्यात आले की, उपनगरात शिवशाही कार्यालयाने संक्रमण शिबिराच्या अनेक इमारती बांधलेल्या आहेत. यातील काही घरे खासगी विकासकांना भाडेतत्त्वावर देण्यात आलेली आहेत. यातील ६ विकासकांनी २०२२ पासून ११६ कोटी रुपयांचे घरभाडे थकविले आहे. ही घरे शिवशाही कार्यालयाची असली तरी विकासकांकडून वसुलीचे वैधानिक अधिकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला आहेत. त्यासाठी आम्हाला वारंवार प्राधिकरणाची मनधरणी करावी लागते. म्हणून शासनाने शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाला वैधानिक अधिकार देणे गरजेचे ठरेल. आता शासन यावर काय निर्णय घेते हे पाहणे औचित्याचे ठरेल. अन्यथा भाडे वसुलीसाठी वर्षानुवर्षे कागदी घोडे नाचवावे लागतील.

# सलमान भारताचा नागरिक नाही का? एकनाथ शिंदेंचा विरोधकांना सवाल



■ मुंबई

**राष्ट्रीय** स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त मुंबईत झालेल्या सरसंघचालक मोहन भागवत यांच्या कार्यक्रमाला बॉलिवूड अभिनेता सलमान खान उपस्थित होता. त्याच्या उपस्थितीवरून विरोधकांनी सलमानसह सर्व मंडळी प्रेमाखातर नाही, तर नरेंद्र मोदी यांच्या सरकारी भीतीमुळे आली होती, अशी टीका केली होती. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सलमान खान हा भारताचा नागरिक आहे. त्यामुळे तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला गेला, तर त्यात चुकीचे काय आहे? असा प्रश्न विरोधकांना विचारला आहे.

ते म्हणाले की, संघाला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. संघाकडे आपण एक देशभक्त आणि राष्ट्रभक्त संघटना म्हणून पाहत आलो आहोत. कट्टर देशभक्ती आणि राष्ट्रप्रेम काय असते, हे जगाने संघाच्या माध्यमातून अनुभवले आहे. जेव्हा जेव्हा देशावर संकट येते, मग ती नैसर्गिक आपत्ती असो किंवा इतर कोणतेही संकट, तेव्हा संघाचे स्वयंसेवक स्वत:हून पुढे येऊन मदतकार्य करतात. सरसंघचालक मोहन भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली संघ सातत्याने राष्ट्रभक्तीचा विचार रुजवण्याचे काम करत आहे. अशा राष्ट्रप्रेमी संघटनेच्या कार्यक्रमाला सलमान गेला असेल, तर त्यात गैर काय? सलमान खान आणि त्याचे संपूर्ण कुटुंब भारतीय संस्कृती मानणारे आहे. त्यांच्या घरी दरवर्षी गणपती बाप्पाची स्थापना केली जाते. तो एक मुंबईकर आहे आणि भारताचा नागरिक आहे. संघाचा कार्यक्रम मुंबईत असल्याने तो तिथे गेला.

# वसई-विरार महापालिकेचा घनकचरा प्रकल्प ठप्प

■ वसई

**वसई**-विरार महापालिकेचा घनकचरा प्रकल्प ठप्प पडला आहे. ठेकेदाराने संथ काम करून नियमांचे उल्लंघन केल्याने पालिकेने ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले आहे.

वसई-विरार महापालिकेची गोखिवरे येथील भोयदापाडा येथे कचराभूमी आहे. शहरातून दिवसाला ८०० ते ८५० मेट्रिक टन इतका कचरा निघतो. या कचराभूमीवर १५ लाख मेट्रिक टन कचरा साचला होता. या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेने मेसर्स साई युटिलिटी या संस्थेला ठेका दिला होता. मात्र ठेकेदाराने संथगतीने काम केल्याने केवळ ५ लाख मेट्रीक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली होती. परिणामी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ठेकेदाराला पालिकेने काळ्या यादीत टाकले. ठेका रद्द झाल्याने १४ वर्षांनंतर कचरा भूमीवर सुरू झालेला बायोमायनिंग प्रकल्प आता ठप्प झाला आहे. याप्रकरणी ठेकेदारानेही न्यायालयात धाव घेतली आहे. त्यामुळे पुढील निर्णय होईपर्यंत कचरा विल्हेवाट प्रक्रिया ठप्प पडली आहे.

# अमेरिकेत मोठी दुर्घटना टळली! विमानाचे रस्त्यावर इमर्जन्सी लँडिंग

■ वॉशिंग्टन

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**अमेरिकेत** एका खासगी विमानातील इंधन मध्येच संपल्याने वैमानिकाने थेट रस्त्याच्या मधोमध विमानाचे इमर्जन्सि लँडिंग केले.रस्त्यावर उतरल्यानंतर या विमानाने अनेक गाड्यांना धडक दिली.मात्र सुदैवाने मोठी दुर्घटना टळली.

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यामध्ये एक छोटे विमान एका वर्दळीच्या रस्त्यावर उतरताना आणि नंतर अनेक वाहनांना धडकताना दिसते.या अपघातात अनेक लोक किरकोळ जखमी झाले. अमेरिकेतील जॉर्जिया राज्यात ही घटना घडली. या विमानात विमानतळावर पोहोचण्याएवढे इंधन नव्हते.त्यामुळे वैमानिकाने इमर्जन्सि लँडिंगचा पर्याय स्वीकारला, रस्त्यावर उतरल्यानंतर विमानाचा उजवा पंख एका वाहनावर आदळला.त्यानंतर वैमानिकाचा ताबा सुटल्याने या विमानाने अनेक वाहनांना धडक दिली. या घटनेनंतर पोलिसांनी काही वेळ या रस्त्यावरील वाहतूक थांबवली. हे विमान गेनेसव्हिलेली गिल्मर मेमोरियल विमानतळावरून कॅन्टनमधील चेरोकी काउंटी प्रादेशिक विमानतळाकडे जाताना हा अपघात घडला.

# उमेदवाराच्या गाडीवर हल्ला उबाठाच्या जिल्हा प्रमुखांवर गुन्हा

■ अलिबाग

**जि.प.** निवडणुकीच्या निकालानंतर अलिबागमध्ये शिंदे सेनेच्या विजयी उमेदवाराच्या गाडीवर हल्ला केल्याप्रकरणी उबाठाच्या जिल्हा प्रमुखांसह १० ते १२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

शिंदे सेनेचे उमेदवार सचिन राऊळ यांच्या विजयानंतर कार्यकर्ते देवदर्शनाला जात असताना त्यांची गाडी अडवण्यात आली. त्यांना लाठ्याकाठ्यांनी मारहाण करण्यात आली. यावेळी गाडीच्या काचाही फोडण्यात आल्या. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, उबाठाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्यासह १० ते १२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

# शिरोळकर हायस्कूलच्या १९७६च्या बॅचचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

■ मुंबई

**चिकित्सक** समूह शिरोळकर हायस्कूलच्या १९७६ च्या बॅचचे स्नेहसंमेलन नुकतेच उत्साहात संपन्न झाले. भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवईदेखील या बॅचचे माजी विद्यार्थी या नात्याने या कार्यक्रमाला उपस्थित होते.

स्नेहसंमेलनाला इस्त्राईल, युरोप, अमेरिका इत्यादी देशांमधून माजी विद्यार्थी आले होते. कार्यक्रमाला त्यावेळच्या शिक्षकांना आवर्जून आमंत्रण दिले गेले होते. त्यापैकी काही शिक्षक कार्यक्रमाला उपस्थित होते. तर काही वयोमानापरत्वे येऊ शकले नाहीत. त्यांनी आपल्या शुभेच्छा पाठवल्या होत्या. सकाळी साडेदहा वाजता माजी सरन्यायाधीश गवई यांचे आगमन झाले.



त्यांना शाळेच्या एनसीसी बटालियन आणि शाळेच्या मुलींच्या बँडच्या वतीने मानवंदना देण्यात आली. त्यानंतर कार्यक्रम सुरू झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अवधूत गोखले, अविनाश पाठक, नितीन आंबर्डेकर यांनी योगदान दिले. विनायक जोशी यांनी शाळेच्या संदर्भात सुंदर ध्वनिचित्रफित बनवली होती. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी जोत्स्ना म्हात्रे, माधुरी गोखले, सुबोध पालकर, मोहन नारकर, राजीव गोविलकर आणि संजय होनाळे यांनी करमणुकीच्या कार्यक्रमाचे नियोजन केले.

# स्मार्ट मीटर वापरा, स्मार्ट बना अभियंता संजय पाटलांचे आवाहन

■ मुंबई

**नवीन** तंत्रज्ञान लोकांच्या जीवनाला सुलभ बनवण्यातच नव्हे तर कमी वेळेत खूप कार्यक्षम पद्धतीने व अचूकपणे काम करण्यात सुद्धा मदत करते. आपल्याला या स्पर्धात्मक जगाशी सुसंगत राहण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे खूप महत्त्वाचे आहे. मुख्य अभियंता भांडुप परिमंडल, संजय पाटील यांनी ग्राहकांना स्मार्ट मीटर वापरण्याबाबत आवाहन केले आहे.

ते म्हणाले की, आपण इतर सर्व क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात केले आहे तर मग वीज क्षेत्रात स्मार्ट मीटर वापरण्याबद्दल ग्राहकांच्या मनात इतकी शंका बाळगण्याचे कारण काहीच नाही. पूर्वीचे मोबाईल, टीव्ही व घड्याळ हे सर्व आता स्मार्ट झाले आहेत, पण केवळ स्मार्ट मीटर लावण्या बाबतीत आपले अनेक गैरसमज आहेत. हे सर्व गैरसमज दूर करून ग्राहकांनी स्मार्ट मीटर लावण्यात महावितरणला सहकार्य करावे.

# टीना अंबानी चौकशीला गैरहजर ईडी नव्याने समन्स पाठवणार



■ नवी दिल्ली

**उद्योगपती** अनिल अंबानी यांच्या पत्नी टीना अंबानी यांना ईडीने ४०,००० कोटी रुपयांच्या कथित मनी लाँड्रिंग प्रकरणी काल चौकशीसाठी बोलावण्यात आले होते. मात्र त्या हजर राहिल्या नाहीत. त्यामुळे या प्रकरणात ईडी लवकरच त्यांना पुन्हा समन्स जारी करणार आहे. ईडीने अनिल धीरूभाई अंबानी समूह आणि संबंधित संस्थांशी निगडित कथित बँकिंग व कॉर्पोरेट फसवणुकीची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. ही एसआयटी अतिरिक्त संचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली काम करत असून, त्यात सुमारे सहा इतर तपास अधिकारी आहेत. ईडी गेल्या वर्षापासून अनिल अंबानी आणि त्यांच्या रिलायन्स समूहातील कंपन्यांची चौकशी करत असून, आतापर्यंत मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत तीन अंमलबजावणी प्रकरण माहिती अहवाल (ईसीआयआर) दाखल केले आहेत. तसेच सुमारे १२,००० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. गेल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने अनिल धीरूभाई अंबानी समूह विरुद्धच्या प्रकरणांचा आढावा घेताना ईडीला न्याय्य, स्वतंत्र, तत्पर आणि निष्पक्ष चौकशी करण्यासाठी (एसआयटी) स्थापन करण्याचे निर्देश दिले होते.

# मिरा-भाईंदर महापालिका प्रदूषणाच्या उगमाचा शोध घेणार

**खासगी संस्थेमार्फत सर्वेक्षण**

■ भाईंदर

**शहरातील** प्रदूषणाचा उगम रोखण्यासाठी मिरा-भाईंदर महापालिकेने खासगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. या सर्वेक्षणानंतर प्रदूषण रोखण्याच्या उपाययोजना केल्या जाणार आहे.

शहरात विविध प्रकारचे प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी पालिकेने प्रदूषणाचे उगमस्थान शोधण्याचा निर्णय घेतला आहे. मिरा रोड येथील दालमिया व्यवस्थापन महाविद्यालयाला यासाठी सर्वेक्षणाचे काम देण्यात आले आहे. नेमके प्रदूषण कुठून आणि कशाप्रकारे निर्माण होते त्याची माहिती या सर्वेक्षणातून मिळणार आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर हे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, असे आयुक्त राधाविनोद शर्मा यांनी सांगितले. प्रदूषण रोखण्यासाठी विविध कारंजे लावणे किंवा तत्सम उपाय केले जातात. मात्र देखभाल दुरूस्ती होत नसल्याने हे उपाय निरूपयोगी ठरतात. त्यामुळे दीर्घकालीन आणि कमी खर्चात केल्या जाणाऱ्या उपायांवर भर दिला जाईल असेही आयुक्तांनी सांगितले. प्रदूषण कमी करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी पुस्तिका तयार केली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# अजित पवारांचा घातपात झाला! रोहित पवारांनी संशय उपस्थित केला

पान १ वरून

व रोहित ते विस्ता कंपनीचे भागधारक आहेत, असे २७ भागधारक आहेत, व्हीएसआर कंपनीकडे सर्वात जास्त लेअरजेट विमाने आहेत. ७.०२ मिनिटाला क्रू मुंबई विमानतळावर पोहोचला, त्यामुळे बारामती येथे व्हिसिब्लिटी आहे असे सांगितले. ७.५६ वाजता मुंबईला टेकऑफ करतो कळविले. एका ग्रुप चॅटवर अधिकारी, पीए आहेत. विमान लोणावळा, मग पुणे, यवत, सुपे येथे असेल. त्यानंतर अपघात झाला. ९ वाजता दादा जखमी आहेत सांगितले. ९.४५ वाजता निधनाची बातमी आली. विमान चालविणाऱ्यांकडे जे ॲप असते त्यात माहिती असते. दोन दिवसांपूर्वी हेच विमान सूरतला जाऊन आले होते. मालकाने सांगितले की, विमान चांगल्या स्थितीत होते. देखरेख उत्तम होती. वैमानिक सक्षम होते. धुक्यामुळे दिसत नसल्याने अपघात झाला असावा. मात्र तेथील नागरिक म्हणतात की, या विमानाचा आवाज वेगळा होता, म्हणजे या विमानाच्या देखरेखीचा संशय येतो. विमान उडवण्यापूर्वी तपासले होते का? विमानाचे टेकलॉग कुठे आहे? विमानाच्या हँगरभोवती सीसीटीव्ही कॅमेरे आहेत ते तपासावे लागतील. या कंपनीत डीजीसीएचे (नागरी उड्डाण महासंचालनालय) अधिकारी काम करतात. गेले काही दिवस त्यांनी फक्त सीसीटीव्ही गोळा केले आहे, म्हणून आम्हाला भीती की, अहवाल बदलला जाईल. तेथे धुके होते म्हणून अपघात झाला. एवढ्यावर हे ढकलून चालणार नाही. २०२३ साली याच कंपनीच्या विमानाला मुंबईत अपघात झाला, पण अजून त्याचा अहवाल आलेला नाही. कारण व्हीएसआरचा डीजीसीएवर ताबा आहे असा आमचा संशय आहे.

व्हीएसआरची मोठी विमाने लंडनलाही जातात. त्यामुळे लंडनने त्यांना २०२३ साली अपघात कसा झाला त्याची माहिती मागितली, पण त्यांनी अहवाल दिला नाही. आणि त्यामुळे ब्रिटनने व्हीएसआरवर बंदी आणली. देशात मात्र अजूनही या कंपनीची उड्डाणे सुरू आहेत. ती थांबवली जात नाहीत. व्हीएसआर कंपनीत काम करणारे माजी वैमानिक व इतर अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. त्यांच्याकडून कळले की, वैमानिकाला १२ तासांची विश्रांती दिली जात नाही, कॉकपीटमधील व्हॉईस रेकॉर्ड बंद ठेवले जाते, एसओपी नाही, खर्चकपात करण्यात कंपनी माहीर आहे. २३०० तासांनंतर इंजिन बदलावे लागते. मात्र तास खोटे लिहून तसेच चालवले जाते.

विमान उडाले आणि घिरटी घातल्यावर वैमानिकाने तिसरी घिरटी न घेता दुसऱ्या घिरटीत उतरवले. दादांना बारामतीला सोडून ते विमान पाटण्याला जायचे होते. त्याचे १० लाख बुडू नयेत म्हणून उतरवायचा दबाव वैमानिकावर आणला का? विमानातील टॉकीवरून ते बोलतात ते समजते, पण ती पीटीटी सिस्टिम बंद होती.

विमान जमिनीजवळ अधिक आले तर इशारा देते की, जमीन जवळ आली, पण हा इशारा ऐकू आला नाही. ही कंपनी स्वतःच स्वतःच्या विमानांची देखरेख करायची, हे तज्ज्ञ आहेत का? रमेश हा त्या विभागाचा प्रमुख आहे त्याची चौकशी का केली नाही?

व्हीएसआर कंपनी हे जास्तीचे ५० लिटरचे पेट्रोल कॅन विमानात ठेवायची म्हणजे पेट्रोल उपलब्ध नसेल तर या कॅनमधील पेट्रोल वापरायचे. अशा तऱ्हेने पेट्रोल ठेवणे हे बॉम्ब ठेवल्यासारखे आहे. या कंपनीच्या मालकावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, असे आमचे मत आहे.




एका सुरक्षा अधिकाऱ्याने सांगितले की राईज ॲण्ड कील फर्स्ट या पुस्तकात म्हटले आहे की, एखाद्याला मारायचे तर त्या व्यक्तीच्या चालकाला मारायचे. या प्रकरणात हेच घडले का?

२७ जानेवारीला ठरले की, सायंकाळी विमानाने बारामतीला जायचे. पण त्यांच्या पक्षातील पूर्व विदर्भातील एक नेते आहेत, त्यांना एका फाईलवर सही हवी होती. ती फाईल मंत्रालयातून आली. मग त्यावर सही केली, त्यात उशीर झाला आणि त्यामुळे दुसऱ्या दिवशी विमानाने जायचे ठरले. अपघातापूर्वी काही महिने आम्ही सतत एकत्र होतो. ते आणि अधिकारी यांच्यासोबत मी घट्ट होतो. तेव्हा एका राजकीय सल्लागाराचे काही कोटींचे कंत्राट रद्द करायचे ठरत होते.

८.१८ वाजता विमान बारामतीच्या संपर्कात आले, पीआयबी हे ८.१९ वाजता म्हणते, विमानाची धावपट्टी ११ दिसते, पाठक मॅडम ओ शीट, ओ शीट म्हणाल्या, पण वैमानिकाने मेडे संदेशही दिला नाही. त्या नोंदण्यांमध्ये २० सेकंदांचा फरक आहे. हा फरक मोठा आहे. विमानात ट्रान्सपाँडर असतो तो सर्व माहिती रेकॉर्ड करतो, पण शेवटच्या एक मिनिटाला हा ट्रान्सपाँडर बंद होता, तो बंद होता की बंद केला? याची चौकशी व्हावी.

बारामतीला हेलिकॉप्टर उतरतात तेथे एमआयडीसीची जमीन पठार आहे. याच २९ धावपट्टीची परवानगी वैमानिकाने मागितली व त्याला ती दिली. त्यानंतर दोन मिनिटांनी अवघड अशा ११ धावपट्टीची परवानगी मागितली. घिरटी मारून येताना पुन्हा २९ धावपट्टीची परवानगी मागितली आणि विमान शेवटी ११ वर उतरवले. सुरक्षित २९ धावपट्टीवर का उतरवले नाही? विमान पठारावर उतरवण्याची संधी असताना ते धडकवायचेच या उद्देशाने मुद्दाम डोंगराळ भागाकडे नेले जात होते का?

बीईए (फ्रान्स), एएआयबी (युके), एनटीएसबी (अमेरिका) या कंपन्यांकडे चौकशी द्या. सीआयडी नको, त्यांना पूर्ण अधिकार नाही, वेळ काढला तर कागदपत्रे बदलतील, देशातील एक व परदेशातील एक संस्थेकडून चौकशी व्हावी. प्लास्टिक बाटलीत काहीही बाहेरून टाकता येते म्हणून गेल्या काही महिन्यात प्लास्टिक बाटलीवरून दादा काचेच्या बाटलीवर आले, ती बाटली तपासून त्यांच्या हाती दिली जायची. ते असे का करू लागले होते?

ते म्हणायचे की, अलीकडे स्वत: बरेच काही घडत आहे. स्वतःचे, विमान घे, हे का सांगायचे माहीत नाही. पण आता चौकशी झाली पाहिजे.

## पतंजली कनेक्शन

साई व अॅरो या दोन एव्हिएशन कंपन्या आहे. त्यांना राजकीय नेत्यांना हेलिकॉप्टर पुरविण्याचे कंत्राट दिले आहे. ते मंत्र्यांचे वेळापत्रक, हेलिकॉप्टर उपलब्धता याची माहिती देतात. त्यासाठी ग्रुप बनवतात, त्यावर कंपनीचे अधिकारी, वैमानिक, क्रू, मंत्र्यांचे पीए असतात. अॅरो ग्रुपवर आदल्या दिवशी २७ जानेवारीला संध्याकाळी ७ वाजता विमानाने जायचे ठरले, असा संदेश आहे. अॅरो ग्रुपवर ती माहिती आहे. या कंपनीचा एक मालक पतंजली कंपनीवरही आहे असे कळते आहे.

## पायलट का बदलले?

रोहित पवार म्हणाले की, मुख्य पायलट का बदलले? साहिल मदन व यश हे नियोजित पायलट ट्रॅफिकमध्ये अडकल्याचे सांगतात. ते कुठे होते? त्याचे सीसीटीव्ही बघितले का? जो पायलट ऐनवेळी आणला त्या पायलटने मद्यपान केले का हे तपासले का? कपूर हे नुकतेच आंतरराष्ट्रीय विमानाने सिंगापूरहून आले होते, मग त्या प्रवासात ते प्यायले होते का? कपूरला आधी मद्यपान केल्याने निलंबित केले होते. त्याला लेअरजेटचे प्रशिक्षण घेण्यासाठी अमेरिकेला पाठवले, पण मद्यपान केल्याने त्यांना परत पाठवले होते. एका मोठ्या नेत्याने मला सांगितले की, नांदेडला याच पायलट बरोबर जाताना या वैमानिकाविरुद्ध त्यांनी कंपनीकडे तक्रार केली होती ती तक्रार तपासायला हवी होती. या कंपनीच्या डायरेक्टरचा मुलगा कॅप्टन रोहित हाही मद्यपान करतो, असे मेसेज आहेत. डायरेक्टरच मद्यपान करतो तर वैमानिकांवर ते काय कारवाई करणार?



# क्रीडा

## टी-२० विश्वचषकात भारतीय खेळाडूंना कुटुंबासोबत राहण्यास बंदी

मुंबई - टी-२० विश्वचषक २०२६ दरम्यान भारतीय क्रिकेटपटूंना कुटुंबासोबत राहण्यास परवानगी नसणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) संघ व्यवस्थापनाची खेळाडूंच्या पत्नी आणि जोडीदारांना टीम हॉटेलमध्ये राहण्याची मागणी फेटाळून लावत स्पर्धे दरम्यान कडक शिस्त धोरण लागू केले आहे. विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर संघ-प्रथम या भूमिकेला प्राधान्य देत हा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. बीसीसीआयने सांगितले आहे की, आयसीसीच्या बहुराष्ट्रीय स्पर्धांदरम्यान खेळाडूंच्या कुटुंबाला संघासोबत राहण्याची परवानगी दिली जाणार नाही.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# परीक्षांच्या तणावामागचे खरे कारण

**दिग्दर्शक** नितेश तिवारी यांच्या 'रामायण' या भव्य चित्रपटाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. या चित्रपटातील कलाकारांच्या निवडीबाबत दररोज नवनवीन बातम्या येत आहेत. अलीकडेच दाक्षिणात्य सुपरस्टार विजय सेतुपती या चित्रपटात बिभीषणाची भूमिका साकारणार असल्याची चर्चा रंगली होती. मात्र, आता स्वत: विजयने स्पष्ट केले आहे की, तो या ऐतिहासिक प्रकल्पाचा भाग नाही. एका मुलाखतीत त्याने म्हटले, नाही सर, मी या चित्रपटात काम करत नाहीये. या बातम्या कुठून येत आहेत, याची मला काहीच कल्पना नाही. अभिनेता विक्रांत मॅसी बाबतही अशीच चर्चा होती की तो या चित्रपटात 'मेघनाद'ची भूमिका करणार आहे. मात्र, विक्रांतनेही सोशल मीडियावर पोस्ट करत या अफवांचे खंडन केले. सध्या मेघनादच्या भूमिकेसाठी राघव जुयाल याचे नाव चर्चेत आहे.

# येतोय गिनी वेडस् सनी चा सिक्वेल

**चित्रपटसृष्टीत** सध्या जुन्या गाजलेल्या चित्रपटांचे सिक्वेल बनवण्याचे वारे वाहत आहेत. याच मालिकेत आता 'गिनी वेडस् सनी' या रोमँटिक कॉमेडी चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. 'झी स्टुडिओज' आणि 'सौंदर्या प्रॉडक्शन' यांच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाची निर्मिती केली जाणार आहे. पहिल्या भागात यामी गौतम आणि विक्रांत मेसी यांची जोडी दिसली होती. मात्र, दुसऱ्या भागात निर्मात्यांनी पूर्णपणे नवीन कलाकारांची निवड केली आहे. अभिनेता अविनाश तिवारी आणि '१२ वी फेल' फेम मेधा शंकर या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. ही नवी कोरी जोडी पडद्यावर आधुनिक काळातील प्रेमसंबंधांची गोष्ट मांडणार आहे. या सिक्वेलच्या दिग्दर्शनाची धुरा प्रशांत झा यांच्याकडे सोपवण्यात आली असून, विनोड बच्चन या चित्रपटाचे निर्माते आहेत. चित्रपटामध्ये नवतरुणाईच्या प्रेमाच्या व्याख्या आणि त्यात येणारे सरप्राइज फॅक्टर पाहायला मिळतील, असे निर्मात्यांनी म्हटले आहे.




# १ मे पासून ठाणे शहरात पहिल्या टप्प्यातील जनगणना

■ ठाणे

२०११ नंतर आता पहिल्यांदाच शासनाने जनगणना कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यानुसार ठाणे महापालिका क्षेत्रात १ मे पासून पहिल्या टप्प्यातील जनगणना सुरु होणार आहे. या पहिल्या टप्प्यात शहरातील घरे, इमारती आणि कुटुंबांची सविस्तर मोजणी केली जाणार आहे. त्यासाठी प्रभाग समितीनिहाय प्रगणक गट तयार केले जाणार असून ५७०० प्रगणकांची नियुक्ती करण्यात येणार आहे, अशी माहिती पालिका प्रशासनाने दिली.

ठाणे शहराची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार सुमारे १८ लाख ४ हजार इतकी होती. यंदाची जनगणना अधिक व्यापक आणि महत्त्वाची ठरणार आहे जनगणनेसाठी ठाणे मनपा क्षेत्रात पाच हजार ७०० प्रगणकांची



नियुक्ती करण्यात येणार असून, प्रत्येक सहा प्रगणकांमागे एक पर्यवेक्षक नेमण्यात येणार आहे. त्यामळे संपूर्ण प्रक्रियेवर प्रभावी नियंत्रण ठेवले जाणार आहे.

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात शहरातील घरे. इमारती आणि कुटुंबाची सविस्तर नोंद केली जाणार आहे. हा टप्पा १ मे ते १५ मे या कालावधीत पार पडणार असून घरांची यादी तयार केली जाणार आहे. प्रत्येक प्रगणकाला

## ५७०० प्रगणकांची नियुक्ती करणार

सुमारे १८० ते २०० घरांची मोजणी करण्याची जबाबदारी देण्यात येणार आहे. दुसरा टप्पा १६ मे ते १५ जून २०२६ दरम्यान होणार असून यामध्ये नागरिकांची वैयक्तिक सामाजिक आणि आर्थिक माहिती संकलित केली जाणार आहे.

# पनवेल महापौरपदी भाजपाचे नितीन पाटलांची बिनविरोध निवड

■ पनवेल

**पनवेल** महानगरपालिकेच्या महापौर पदावर भाजपाचे नितीन पाटील व उपमहापौर पदासाठी प्रमिला पाटील यांची आज निवड झाली. महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने ही निवडणूक बिनविरोध पार पडली.

महाविकास आघाडीच्या वतीने महापौर पदासाठी अर्चना भोईर, तर उपमहापौर पदासाठी लीला कातकरी यांनी उमेदवारी दाखल केली होती. मात्र, निवडणूक प्रक्रियेपूर्वी दोन्ही उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने सत्ताधारी गटाच्या उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली.

# एमपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणाचा दरीत मृत्यू

## वसंत गिरी यांचा एकुलता एक मुलगा

■ लोणावळा

**येथील** एका टेकडीवर फेरफटका मारण्यासाठी गेलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील एका २६ वर्षीय तरुणाचा पाय घसरून दरी कोसळल्याने जागीच मृत्यू झाला. प्रज्वल वसंत गिरी असे या मृत तरुणाचे नाव असून तो पुण्यात बीएड शिक्षण घेत एमपीएससी परीक्षेची तयारी करत होता.

बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर येथील प्रसिद्ध व्याख्याते प्रा.वसंत गिरी यांचा एकुलता एक पुत्र प्रज्वल गिरी हा त्याच्या नातेवाईकांसोबत कारने मुंबईहून पुण्याला येत होता.लोणावळा येथे अल्पोपहार करण्यासाठी ही मंडळी थांबली.परंतु प्रज्वल आणि त्याचा मावसभाऊ या दोघांनी आम्ही टेकडीवरुन फिरून येतो, असे सांगितले. मात्र टेकडीवर फेरफटका मारायला जाणे त्यांच्या जीवावर बेतले. तेथून माघारी फिरत असताना पाय घसरुन प्रज्वल खोल दरीत कोसळला.त्यातच त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्रज्वल हा वसंत गिरी यांचा एकुलता एक मुलगा होता. प्रज्वलचे वडील प्रा. वसंत गिरी मेहकर येथील मेएसो महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत. 'वऱ्हाड निघालंय लंडनला' या एकपात्री प्रयोगाचे त्यांनी पाचशेपेक्षा अधिक प्रयोग राज्यभर सादर केले आहेत. क्रांतिकारकांच्या जीवनावर आधारित नाट्यप्रयोगाचे त्यांनी हजारावर सादरीकरण केले आहे.त्यांची पाच पुस्तके प्रसिद्ध आहेत.

# बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकात एआयचा वापर नको

## उद्धव ठाकरेंच्या सूचना

■ मुंबई

**शिवसेनाप्रमुख** बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या उभारणीदरम्यान कुठल्याही प्रकारे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करू नये. स्मारकातील सर्व घटक पूर्णतः खर आणि अस्सल असावेत, अशा स्पष्ट सूचना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी स्मारक समितीच्या बैठकीत दिल्या.

शिवाजी पार्क येथील महापौर निवासात उभारण्यात येणारे बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक सध्या अंतिम टप्प्यात आहे. स्मारकाची संकल्पना आणि अंमलबजावणी याबाबत आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत उद्धव ठाकरे यांनी या सूचना केल्या. हे स्मारक मराठी माणसाचा स्वाभिमान उंचावणारे आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारे असले पाहिजे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. स्मारकाचे काम २३ जानेवारी २०२७ पूर्वी पूर्ण व्हावे, यासाठी कामाचा वेग वाढवण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. स्मारकात कोणकोणत्या गोष्टींचा समावेश असावा, याचा प्राथमिक निर्णय झालेला असला तरी, आणखी कोणत्या नाविन्यपूर्ण बाबी समाविष्ट करता येतील, याबाबत सूचना देण्याचे निर्देशही उद्धव ठाकरे यांनी दिले. या स्मारकात बाळासाहेब ठाकरे यांची भाषणे, छायाचित्रे, लेखन, व्यंगचित्रे, वैयक्तिक वस्तू यांचा समावेश करण्यात येणार आहे.

# देशातील पहिली मोनोरेल लवकरच पुन्हा धावणार

■ मुंबई

**देशातील** पहिला मोनोरेल प्रकल्प असलेली चेंबूर ते संत गाडगे महाराज चौक (सात रस्ता) मोनोरेल लवकरच पुन्हा धावणार आहे.ही मोनोरेल मार्गिका सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली इंडिपेंडंट सेफ्टी असेसमेंट ही सुरक्षा तपासणी करण्यात आली आहे, अशी माहिती 'एमएमआरडीए' च्या अधिकाऱ्याने दिली.

सातत्याने बिघाड होऊ लागल्याने आणि या मार्गिकेवर नवी यंत्रणा बसविण्यासाठी २० सप्टेंबरपासून ही मोनोरेल अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्यात आली आहे. त्यानंतर जुनी

## सुरक्षा तपासणी सुरू



यंत्रणा काढून नवी बसविण्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. तसेच या मोनोरेलच्या ताफ्यात नव्या दहा गाड्या दाखल झाल्या आहेत. त्यांच्या चाचण्याही जवळपास पूर्ण झाल्या आहेत. त्यानंतर ही मोनोरेल पुन्हा सुरू करण्यासाठी एमएमआरडीएने गेल्या आठवड्यात आयएसए सुरक्षा तपासणी सुरू केली आहे.आणखी काही दिवस ही तपासणी चालेल. सुरक्षेच्या खात्रीनंतर वाहतूक सुरू करण्यासाठी प्रमाणपत्र मिळेल.या मोनोरेलचे संचालन आणि देखभाली करण्यासाठी कंत्राटदार नेमला जाणार आहे. यासाठी पॉवर मेक प्रोजेक्ट्स कंपनीने लघुत्तम २९६ कोटी रुपयांची निविदा दाखल केली आहे. या कंपनीला मोनोरेल चालविण्याचे कंत्राट मिळणार आहे. कंत्राटदाराला पाच वर्षांसाठी संपूर्ण मोनोरेल मार्गिका चालवावी लागणार आहे.यामध्ये मोनोचे परिचालन, स्थानक व्यवस्थापन, डेपो हाताळणी, गाड्यांची देखभाल दुरुस्ती आदी कामांचा समावेश आहे.

# संभाजीनगरात भाजपाचा महापौर उबाठा, वंचित, राष्ट्रवादी गैरहजर

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर महानगरपालिकेत महापौरपदी भाजपाचे समीर राजूरकर तर उपमहापौरपदी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे राजेंद्र जंजाळ यांची बहुमताने निवड करण्यात आली. महापौर आणि उपमहापौर पदासाठी झालेल्या निवडणुकीत विजयी उमेदवार समीर राजूरकर आणि राजेंद्र जंजाळ यांना प्रत्येकी ७० मते मिळाली. त्यांच्या विरोधात रिंगणात असलेल्या एमआयएमच्या उमेदवार महमद वसीम यांना केवळ ३३ मतांवर समाधान मानावे लागले. या निवडणूक प्रक्रियेत एकूण १०३ नगरसेवकांनी मतदान केले. विशेष म्हणजे या निवडणुकीत १२ नगरसेवक तटस्थ राहिले. यामध्ये उबठाचे ६, वंचित बहुजन आघाडीचे ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या १ नगरसेवकाचा समावेश आहे. काँग्रेसच्या नगरसेविका मलिका हबीब कुरेशी या मतदानावेळी गैरहजर होत्या.

# मध्य रेल्वे २४ विशेष गाड्या चालवणार

■ मुंबई

**प्रवाशांच्या** वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वे मुंबई-नागपूर, मुंबई-कोल्हापूर, मुंबई-सावंतवाडी रोड तसेच पुणे-नागपूर मार्गावर २४ विशेष गाड्या चालवणार आहे. या गाड्यांचा उद्देश प्रवाशांना गर्दीमुक्त आणि आरामदायी प्रवासाची सुविधा देणे हा आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि कोल्हापूर दरम्यान ६ सेवा उपलब्ध असतील. १३, १८, २० फेब्रुवारी रोजी सीएसएमटीवरून सुटणारी ट्रेन दुसऱ्या दिवशी कोल्हापूर येथे पोहोचेल. तर कोल्हापूरवरून सुटणारी ट्रेन दुसऱ्या दिवशी सीएसएमटी येथे पोहोचेल. तसेच, सीएसएमटी-सावंतवाडी रोड मार्गावरही ६ सेवा चालवण्यात येतील. सीएसएमटी-नागपूर आणि पुणे-नागपूर मार्गावर सुपरफास्ट विशेष गाड्या धावणार आहेत. लोकमान्य टिळक टर्मिनस आणि नागपूर दरम्यान ४ सेवा असतील, तर पुणे-नागपूर मार्गावर ४ आणि २ सेवा चालवल्या जातील.

# पालिकेत पराभूतांना स्वीकृत सदस्य म्हणून संधी नाही

## चंद्रकांत पाटलांचे स्पष्टीकरण

■ पुणे



**महापालिका** निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांना स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी दिली जाणार नाही, असे स्पष्ट धोरण भाजपाचे असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले. पुणे महानगरपालिकेत महापौर व उपमहापौर निवडीनंतर त्यांनी हे स्पष्टीकरण दिले. या भूमिकेमुळे स्वीकृत नगरसेवक होण्याची अपेक्षा असलेल्या अनेक इच्छुकांच्या आशा मावळल्या असून, राजकीय वर्तुळात चर्चांना वेग आला आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, भाजपाचे धोरण स्पष्ट आहे. महापालिका निवडणुकीत पराभूत झालेल्या कोणत्याही उमेदवाराला स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी दिली जाणार नाही. स्वीकृत सदस्यांची नियुक्ती पाच वर्षांसाठी नसून अडीच वर्षांसाठीच केली जाणार आहे. या माध्यमातून सुमारे १४ कार्यकर्त्यांना संधी मिळेल. मात्र, प्राधान्य अशा कार्यकर्त्यांना दिले जाईल ज्यांना निवडणुकीत उमेदवारी मिळाली नव्हती आणि जे अनेक वर्षांपासून पक्षासाठी संघटनात्मक काम करत आहेत.


# मुस्लीम व्यक्तीला मदत करणे जिम चालकाला महागात पडले

■ डेहराडून

**हिंदू** आणि मुस्लीम यांच्यातील तेढ सध्या किती वाढली आहे याचे एक नवे उदाहरण उत्तराखंडमधून समोर आले आहे. येथे एका वृद्ध मुस्लीम दुकानदाराची बाजू घेणे हिंदू व्यायामशाळा (जिम) चालकाला चांगलेच महागात पडले. आठवडाभरापूर्वी त्याच्या व्यायामशाळेत एकेकाळी दीडशे सदस्य होते. ती अचानक कमी होऊन पंधरावर पोहोचली आहे.

दीपक कुमार (३८) असे या व्यायामशाळा चालकाचे नाव आहे. कोटद्वारमध्ये हल्क जिम नावाने तो खासगी व्यायामशाळा चालवतो. व्यायामशाळेची जागा त्यांनी भाडेतत्वावर घेतली आहे. २६ जानेवारी रोजी हिंदू तरुणांचा एक गट वृध्द मुस्लीम दुकानदाराला त्याच्या दुकानाच्या पाटीवरील बाबा हा शब्द काढण्यास सांगत होता. मात्र त्या दुकानदाराचा बाबा हा शब्द काढण्यास विरोध होता. या भांडणात दीपक कुमारने मुस्लीम दुकानदाराची बाजू घेतली. जेव्हा हिंदू तरुणांनी त्याला त्याचे नाव विचारले तेव्हा त्याने रागाने आपले नाव महंमद दीपक असल्याचे सांगितले. या भांडणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. संपूर्ण शहरात याची चर्चा झाली. काही लोक दीपक कुमारचे समर्थन करत होते. तर काही त्याच्या कृतीवर नाराज होते. हा व्हिडिओ कट्टर हिंदुत्ववादी संघटना बजरंग दलच्या कार्यकर्त्यांनीही पाहिला. त्यानंतर मात्र दीपक कुमारचे वाईट दिवस सुरू झाले. बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी दीपक कुमारला त्याच्या कृत्याचा जाब विचारला. हा व्हिडिओसुध्दा सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यानंतर दीपक कुमारच्या व्यायामशाळेतील सदस्यांची संख्या अचानक घटली. मुस्लिमाची बाजू घेणाऱ्या दीपक कुमारपासून चार हात दूर राहणे सदस्यांनी पसंत केले. ही संपूर्ण कहाणी दीपक कुमारने माध्यमांना सांगितली. चांगुलपणाची किंमत चुकवावी लागते, अशी खंत दीपक कुमारने माध्यमांसमोर व्यक्त केली.

# नवाकाळ शब्दकोडे-१५१६



**आडवे शब्द –**

२. पुढे पुढे, काळाच्या ओघात ५. फाटके, मोडकळीस आलेले ७. अकस्मात ११. लहान हिरा १२. धुणे १४. लीलया १५. कृत्रिम दंतसंच १६. वनात वावरणारा १९. पक्षी २०. पुन्हा २१. सह्याद्रीच्या परिसरात आढळणारी मोठी खार २२. हवेत उडू शकणारा सस्तन प्राणी, हा निशाचर आहे २३. पाऊल, टांग २५. राहण्याची खोली (इं.) २७. तद्रूप झालेला २८. लाच खाणारा, भ्रष्ट ३०. मसालेदार ३२. रुई ३४. झाकण असलेले छोटे पात्र ३७. उग्र, प्रखर ३९. लहान मुलींचा चूलबोळकी जमवून मांडला जाणारा लुटुपुटीचा संसार ४२. बुंदीच्या लाडवांचा प्रकार ४४. दडपण ४५. श्रीकृष्णाचे बालपण गेले ती जागा ४६. काष्ठ ४८. सोशिक स्वभाव ५१. कापसाची एक जात, शाल्मली ५२. पाव आणि मसालेदार भाजी वापरून केलेले एक फास्ट फूड - कच्छी xxx ५३. मार्ग ५४. उष्ण ५६. भाजक्या पोह्यांचा खमंग पदार्थ ५८. धूम्रपानाचा महाग व पाश्चात्य प्रकार ५९. नांगर ६१. बेलगाम ६२. उगाच ६३. दाट ५४. जे हवे ते मिळवण्यासाठी प्रयत्न करीत राहणे ६७. कंबर ६८. संक्षिप्त, थोडक्यात ६९. शर्त ७०. उपरोध ७१. फळांचा ज्यूस ७३. गायीची पाडी, गोजी ७५. निरुद्योगी ७७. सांड, प्रजोत्पादनासाठी पोसलेला बैल ७८. कनवट ८०. निद्रा ८१. आठ ८२. बसण्याची लाकडी फळी ८३. धूळ, माती, कचरा ८४. रेल्वेचा स्लीपर कोच ८५. ढग दाटून सूर्य झाकला जाणे, शिरवाळ ८७. चंगळ ८९. कब्जा ९०. पत्त्यांचा घातक जुगार ९१. वाहून नेणे ९३. वीज तयार करण्याचे यंत्र ९५. शर्विलक ९६. गोंगाट ९८. डोळ्यांच्या उघड्या पृष्ठभागावरील पारदर्शक आवरण १००. पुन्हा १०२. जाजम, बिछायत १०३. सिंह १०४. सर्वजण, एकूण एक

**उभे शब्द –**

१. भक्त प्रल्हादचे वडील २. कमतरता ३. पुलक, शहारे ४. राख ५. खोगीर ६. पुण्यातला शिवकालीन गड (जुने नाव कोंढाणा) ८. नोकर ९. नुकतीच तारुण्यात पदार्पण केलेली १०. कलिका १३. लाडिक १४. बरोबर, संगतीने १७. आदराने मस्तक झुकवलेला १८. विपुलता, वैपुल्य १९. वेढा, गराडा २४. मुशायऱ्यातला लोकप्रिय काव्यप्रकार २६. स्वार्थ २९. पत्रास, चाड ३१. कुर्ता ३२. फलप्राप्तीच्या आशेने केलेले व्रत ३३. बैठक, भाषणाची जागा ३५. पराभव ३६. श्रीलंकेचे काव्यमय वर्णन ३८. एकूण परिस्थती ४०. टंचाई ४१. क्रीडा, मुलींचे एक नाव ४३. वाराणशी ४४. देणारा, दानी ४७. विष्णूचा दुसरा अवतार ४९. अभिनेता ५०. खांबावर आडवी टाकलेली तुळई ५१. सावली, चाहूल ५२. मोठा (पराभव) ५५. होडी ५६. चिवटपणे केलेले प्रयत्न, जिद्द ५७. न समजणारे, दुर्बोध ५८. तुकडे करणे, कठोरपणे केलेले पृथक्करण ५९. आग्रह ६०. गळा ६१. मुभा ६२. रंग उडालेला ६३. अल्प वेळ, चोवीस पळे ६४. पांचट ६५. गाव ६६. राशी, ढीग ६९. संकट ७०. असत्य ७२. अस्पष्ट ७४. अब्रूदार, प्रतिष्ठित ७६. नेमस्त ७९. हुशार ८१. पायाच्या अंगठ्यातला रुप्याचा दागिना ८२. पर्ण, पत्र ८४. पांडवांनी शस्त्रे लपवलेला वृक्ष ८५. चित्त ८६. सामूहिक प्रार्थनेचा प्रकार ८७. मराठी पहिला महिना ८८. उत्कर्ष, भरभराट ८९. तराजू ९०. चांदी ९२. कमी वजनाचे-दर्जाचे ९४. निर्धार ९७. प्रवासाचे सार्वजनिक वाहन ९८. ठक ९९. विक्रीस मांडलेले १००. पोळीचा लहान व तळलेला विकल्प १०१. प्रेयसी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५१५ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. भकास ३. दानत ६. हल्ली ७. तदितर १०. मराठी ११. उरग १२. दरवळ १४. माड १५. लाभ १७. मदनबाण १९. हसतमुख २३. राघोबादादा २६. जव २७. वळणदार २८. उर्मी ३०. दरबार ३२. गाऱ्हाणे ३३. लीनता ३४. अल्पोपहार ३७. सबंध ३९. वस्त्र ४०. डर ४२. कलप ४५. डरकाळी ४७. लड ४९. उजागर ५०. राजमहाल ५२. बोलबच्चन ५४. वंचित ५६. बाजारगप्प ५९. आले ६०. वृकोदर ६२. जयविजय ६३. जड ६४. नवसाक्षर ६६. काका ६८. दानव ६९. वेचक ७०. डबलबी ७२. अंगद ७४. दवा ७६. लीलावती ७९. जडजंबाल ८१. कानन ८२. घेरी ८३. जप ८५. बाक ८६. गरीब ८७. विसावा ८९. लाभ ९०. रम्य ९१. तकलादू ९४. मस ९५. टिपण ९७. नस ९९. उत्तराधिकारी १००. मेद १०२. दगलबाजी १०४. खुला १०५. घडणावळ १०६. रगड १०७. आळा

**उभे शब्द :** १. भराभरा २. काठी ३. दारमदार ४. नगद ५. वारण ६. हळहळणे ८. दिमाख ९. तड १०. टेंभा १२. दबाव १३. शतदा १६. तुंबा १८. नजर २०. सण २१. मुरलीधर २२. गुर्मी २४. घोरपड २५. दादर २७. वऱ्हाड २८. उतावळा २९. बेअक्कल ३१. बाणा ३५. हार ३६. बैल ३८. बंडलबाज ४१. अजानवृक्ष ४२. करवंद ४३. परात ४४. समवयस्क ४६. कापूर ४८. डबोले ४९. उच्च ५१. थप्पड ५३. बल्लव ५५. चिरकाल ५७. जायदाद ५८. गजवदन ५९. आढेवेढे घेणे ६१. कोरड ६४. नकली ६५. सासव ६७. काबीज करणे ७१. बया ७२. अंबारी ७३. गलबत ७५. वानवा ७७. लालसा ७८. तीज ८०. जंग ८१. कामला ८४. पलाण ८७. विसराळू ८८. वाटिका ९२. कलौंजी ९३. दूधखुळा ९४. मत्त ९६. परीघ ९७. नगर ९८. सलग ९९. उडी १००. मेणा १०१. दव १०३. बाड

# लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव

पान १ वरून

पक्षाचे नेते राहुल गांधींना बोलू दिले जात नाही, विरोधी पक्षाच्या आठ खासदारांचे निलंबन मनमानी पद्धतीने करण्यात आले आहे. भाजपाच्या खासदारांनी माजी पंतप्रधानांबाबत केलेली वादग्रस्त वक्तव्ये करू दिली. काँग्रेस पक्षाच्या खासदारांवर हल्ल्याचा कट रचल्याचा आरोप लोकसभा अध्यक्ष कसा काय करु शकतात? या चार महत्वाच्या मुद्द्यांवर अविश्वास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

२ फेब्रुवारी रोजी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेदरम्यान राहुल गांधी यांनी माजी लष्करप्रमुखांच्या अप्रकाशित पुस्तकातील कथित उल्लेखांवरून सरकारवर टीका केली होती. मात्र सरकारने हे आरोप फेटाळून लावले. विरोधकांचा आरोप आहे की, सरकारच्या दबावाखाली लोकसभाध्यक्षांनी राहुल गांधींना सभागृहात बोलू दिले नाही. यानंतर ४ फेब्रुवारी रोजी लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण होणार होते, परंतु ते पुढे ढकलण्यात आले. दुसऱ्या दिवशी लोकसभाध्यक्षांनी सांगितले की काही विरोधी खासदारांचे सभागृहातील वर्तन लोकशाही परंपरांना साजेसे नव्हते. त्यामुळे पंतप्रधानांच्या सुरक्षेच्या दृष्टीने त्यांचे भाषण रद्द करण्यात आले.

विरोधकांनी लोकसभाध्यक्षांचा हा दावा फेटाळून लावत त्यांच्या विधानावर तीव्र आक्षेप नोंदवला. विरोधी खासदारांनी सभापतींना पत्र लिहून त्यांच्यावर पक्षपाती वर्तनाचा आरोप केला होता. नोटिशीमध्ये विरोधकांच्या आठ खासदारांना मनमानी पद्धतीने संपूर्ण अर्थसंकल्पीय अधिवेशनातून निलंबित केल्याचा आरोपही करण्यात आला आहे, तर ते लोकशाही मार्गाने आपली भूमिका मांडत होते, असे विरोधकांचे म्हणणे आहे. विरोधकांनी ओम बिर्ला यांच्या विधानावरही आक्षेप घेतला. त्यांनी म्हटले होते की ४ फेब्रुवारी रोजी काही काँग्रेस खासदार पंतप्रधानांच्या आसनाकडे गेले होते आणि एखादी अनपेक्षित घटना घडू शकली असती, त्यामुळे भाषण पुढे ढकलण्यात आले. विरोधकांच्या मते, हे काँग्रेस खासदारांवरील खोटे आरोप आहेत.

**प्रस्तावावर राहुल गांधी यांची सहीच नाही**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना संसदेत बोलू दिले जात नसल्याने काँग्रेस पक्षाने या अविश्वास प्रस्तावासाठी पुढाकार घेतला. पण राहुल गांधी यांनीच या नोटीसवर स्वाक्षरी केलेली नाही. विरोधी पक्षनेत्याने सभापतीविरुद्ध अविश्वास ठरावाच्या नोटिशीवर स्वाक्षरी करणे योग्य ठरणार नाही, असे राहुल गांधी यांचे मत असल्याचे सूत्रांनी सांगितले. संसदीय शिष्टाचार आणि परंपरांचा सन्मान राखण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला, असेही त्यांनी नमूद केले.

# मोदींच्या भीतीपोटी गर्दी! रटाळ भाषण कोण ऐकणार सरसंघचालक भागवतांवर राज ठाकरेंची टीका

पान १ वरून

की, मुळात भाषावार प्रांतरचना या देशात का करावी लागली हा इतिहास भागवतांना निश्चितच माहीत असावा. भाषेबद्दलचे प्रेम, प्रांताबद्दलचेप्रेम हा जर भागवतांना आजार वाटत असेल तर हा आजार या देशातील बहुसंख्य राज्यांमध्ये आहे. दक्षिणेत कर्नाटक ते तामिळनाडू इथे तीव्र भाषिक आणि प्रांतिक अस्मिता आहेत. तिकडे पश्चिम बंगाल असो, पंजाब असो अगदी गुजरात असो, तिकडे पण ही भावना आहे. ही भावना नक्की काय आहे हे कधी भागवतांनी समजून घेतली आहे का? जेव्हा देशातील चार ते पाच राज्यातील लोकांच्या झुंडीच्या झुंडी वेगवेगळ्या राज्यात जातात, तिकडे आगाऊपणा करतात, तिथल्या स्थानिक संस्कृतीला नाकारून तिथल्या भाषेचा अपमान करतात, स्वतःचे मतदारसंघ तयार करतात, तेव्हा स्थानिकांच्यात रोष तयार होतो आणि त्यातून उद्रेक तयार होतो. याला तुम्ही आजार म्हणणार? आणि जर तुमच्या लेखी हा आजार असेल तर तो आजार आपल्या गुजरातमध्ये पण पसरला आहे. गुजरातमध्ये उत्तर प्रदेश आणि बिहारच्या हजारो लोकांना जेव्हा पळवून लावले तेव्हा तिकडे जाऊन समरसतेचे धडे का नाही दिलेत? असेच धडे कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश ते पंजाब ते पश्चिम बंगाल इथे जाऊन का नाही दिलेत?

राज ठाकरे यांनी पुढे म्हटले की, मराठी माणूस सहनशील आहे, पेक्षा इथले सत्ताधारी लिबलिबित कण्याचे आहेत. म्हणून भागवतांची हिंमत होते. काही महिन्यांपूर्वी निवडणुकीच्या तोंडावर भय्याजी जोशींनी मुंबईची भाषा ही फक्त मराठी नाही तर ती गुजराती पण आहे, अशा आशयाचे विधान करत मराठी माणसाला डिवचत गुजराती भाषिकांना चोंबाळण्याचा प्रयत्न केला. हे सगळे करून अप्रत्यक्षपणे भाजपाला फायदा कसा होईल हे पाहिले. मुळात स्वतःला अराजकीय संघटना म्हणवून घेणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या भानगडीत मुळात पडायचंच कशाला? हिंदुत्व आणून आम्हाला ज्ञानामृत पाजायचा प्रयत्न करू नका. मी अनेकदा सांगितले आहे की, ज्या वेळेस हिंदूंवर हल्ला होईल तेव्हा आम्ही हिंदू म्हणून आमच्याकडून जे काही करणे शक्य होईल ते आम्ही करूच! रझा अकादमीच्या दंगलीविरोधात मोर्चा काढणारा आणि मशिदींवरील भोंग्यांच्या विरोधात आंदोलन करणारा, तसेच हिंदू सणांच्या वेळी मोठमोठ्याने लाऊडस्पीकर लावणे आणि मोठमोठ्याने डिजे लावून नागरिकांना त्रास होत असताना त्या विरोधात भूमिका घेणारा महाराष्ट्र नवनिर्माण सेना हाच पक्ष होता. जे चूक ते चूकच हे आम्ही ठासून बोलतो. तसे मोहनराव आपण कधी बोलणार? हिंदुत्वाच्या नावाखाली देशभरात जो धिंगाणा सुरू आहे, उत्तर भारतात कावड यात्रांमधे बिभत्स पद्धतीने महिलांना नाचवले जाणे, तसेच २०१४ ला बीफ एक्सपोर्टमधे जो आपला देश ९ व्या क्रमांकावर होता तो आज दुसऱ्या क्रमांकावर आलाय आणि आपल्या देशात गोहत्येचे राजकारण करून जो तमाशा सुरू आहे आणि त्यातून माथी भडकवली जात आहेत त्यावर तुम्ही कधी बोलणार? त्या व्यापाऱ्यांच्या विरोधात सरकारला खडे बोल कधी सुनावणार? असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

# नरवणेंचे पुस्तक प्रकाशित नाही

पान ८ वरून

ते करा, असे सांगितल्याचा उल्लेख असल्याचा दावा केला. या मुद्द्यावरून लोकसभेत मोठा गोंधळ झाला. कामकाज स्थगित करण्यात आले. त्यानंतर गोंधळ घालणाऱ्या विरोधकांच्या आठ खासदारांचे निलंबन केले होते. तेव्हापासून हे पुस्तक देशभर चर्चेचा विषय ठरले आहे. या पुस्तकात २०20 मधील भारत-चीन संघर्ष आणि अग्निवीर योजनेचा उल्लेख असल्याचे सांगितले जाते. पुस्तक सध्या संरक्षण मंत्रालयाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे. आज हे पुस्तक प्रकाशित नसल्याचे प्रकाशक कंपनीनेच जाहीर सांगितले.

नरवणे यांनी हे पुस्तक प्रकाशित झाल्याची पोस्ट केली होती. त्यामुळे प्रकाशक खोटे बोलतात का? असा सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला. कारण नरवणे खोटे बोलू शकत नाही, असे त्यांनी सांगितले.

# दादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही

पान ८ वरून

पुढे त्या विधान भवन परिसरात पोहोचल्या. तिथे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. सकाळी सुमारे ११ वाजता सुनेत्रा पवार पुत्र पार्थ पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, खा. प्रफुल्ल पटेल, मंत्री छगन भुजबळ, धनंजय मुंडे आणि रुपाली चाकणकर यांच्यासह मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील उपमुख्यमंत्र्यांच्या दालनात दाखल झाल्या. दालनात प्रवेश करताच त्यांनी प्रथम खुर्चीला व त्यानंतर टेबलाला हात जोडून नमस्कार केला. यावेळी त्यांनी अजित पवार यांच्या प्रतिमेला नमन केले. यावेळी त्यांचे पुत्र पार्थ पवार भावूक झाले होते. कार्यभार स्वीकारल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची पहिली बैठक घेतली आणि विविध महत्त्वाच्या विषयांचा आढावा घेतला. त्यानंतर त्या मंत्रिमंडळ बैठकीला उपस्थित राहिल्या. उपमुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांची ही पहिली मंत्रिमंडळ बैठक होती. आपल्या एक्स पोस्टमध्ये सुनेत्रा पवार यांनी म्हटले की, आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारत असताना विश्वासाची, कर्तव्याची आणि त्यागाची जाणीवसुद्धा आहे. मा. अजितदादांनी आयुष्यभर महाराष्ट्राच्या जनतेसाठी झटत विकासाचा जो ध्यास घेतला, तोच माझ्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे.


**ज्याच्याशी संबंधित आहे त्यांच्याकरिता**

**श्री.वसंत बाबुराव नागरे (मयत)** हे **समर्थ एसआरए को.हौ.सो.लि. (सोसायटी)** चे सदस्य आणि **फ्लॅट क्र.४०२, विंग बी, समर्थ एसआरए को.हौ.सो.लि., जिवलपाडा, ठाकूर व्हिलेज, कांदिवली ई, मुंबई ४००१०१** चे धारक होते, हे सीटीएस क्र.८०५ए, ८०५बी आणि ८०५सी असलेल्या जमिनी आणि मैदानांवर बांधकामित, मुंबई उपनगराच्या नोंदणी जिल्ह्यात आणि उपजिल्हा **(प्रिमायसेस)** मध्ये पोईसर, तालुका बोरीवली येथे स्थित होते आणि **०५.०८.२०२४ रोजी मुंबई येथे मृत्युपत्र न करता निधन झाले**. मृतकाच्या कायदेशीर वारसांनी दिनांक **०३.०४.२०२५** रोजीच्या हक्कसोड कराराद्वारे, अनुक्रमांक एमबीआय २०/५६७७/२०२५ अंतर्गत नोंदणीकृत, सोसायटीच्या सदर प्रिमायसेसमध्ये/ भांडवलात / मालमत्तेतील त्यांचे हक्क श्रीमती अनिता वसंत नागरे यांच्या नावे सोडले आहेत.

मी याव्दारे, सदर **प्रिमायसेस** आणि **सोसायटी**च्या भांडवल/मिळकतीमधील, **मयत** सभासदाच्या सदर शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतरण **श्रीमती अनिता वसंत नागरे यांच्या नावे होण्यास** वारस किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते ह्या सूचनेच्या प्रसिध्दीपासून **१४ (चौदा) दिवसांत** सदर **प्रिमायसेस** आणि **सोसायटी**च्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावा/आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुरावाच्या प्रतींसह मागविण्यात येत आहेत. जर वर नमूद केलेल्या कालावधीत कोणतेही दावे/हरकती प्राप्त झाल्या नाहीत, तर मी अशा दाव्यांचा/हरकतींचा संदर्भ न घेता आवश्यक असलेला कोणताही दावा नसल्याचे पत्र जारी करेन आणि दावे/हरकती, जर असतील तर, माफ केलेले मानले जातील आणि कोणत्याही प्रकारे बंधनकारक नसतील. मयत सभासदाच्या सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील शेअर्स व हितसंबंधाशी सोसायटी उपविधीतील तरतुदींमधील दिलेल्या मार्गाने व्यवहार करण्यास सोसायटी मोकळी असेल.

**अनिल डी. पांडे - वकील**
कामधेनू असोसिएट्स - वकील आणि कायदेशीर सल्लागार
फ्लॅट क्र. सी-१०३, १ला मजला, गोकुळ होरायझन,
गुंदेचा ट्रिलियम समोर, ठाकूर गाव, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१.



**नोटीस**

महालक्ष्मी एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या; पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३० या संस्थेचे सभासद असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत सदनिका धारण करणाऱ्या खालील सभासदाचे निधन झाले आहे.

| मयत सभासदाचे नाव | मृत्यू दिनांक | वारसाचे नाव | रूम नं. |
|---|---|---|---|
| बिपत रामहरक गुप्ता (वडील) | २५/०७/१९९५ | मोहन बिपत गुप्ता | ई विंग/ ५०५ |
| जैराजी बिपत गुप्ता (आई) | १५/१२/२०२५ | | |

यांनी संस्थेकडे वारस नोंदणीबाबत अर्ज दाखल केला असून संस्था या जाहिरातीद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/ हारकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/ हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून ७ दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांच्या व हरकतीच्या पुष्ठर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तींकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाली नाही तर मयत सभासदाचे संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या / हरकत आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास/ हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांच्याकडे सकाळी ११.०० ते ०१.०० पर्यंत नोटीस दिलेच्या तारखेपासून नोटीसीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यत उपलब्ध राहील.

**ठिकाण : मुंबई** सही/-
**दिनांक :** ११/०२/२०२६ **अध्यक्ष/सचिव**
**महालक्ष्मी एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**



**PUBLIC NOTICE**

**MR. MEGHASHYAM GOPINATH MALI and SMT. SUPRIYA MEGHASHYAM MALI,** were joint members of the **RAMA'S TOWER CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD,** (Reg. No. MUM/WT/ HSG/ TC/9242 dt. 9-12-2005) and jointly holding **Flat No.203, located on the 2nd floor of the Building known as RAMA'S TOWER CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD, situated at Patil Paradise Complex, Near Tambe Nagar, S.N.Marg, Mulund (West), Mumbai 400080.** The said **MR. MEGHASHYAM GOPINATH MALI** died intestate on **15/04/2006,** without making any nomination.

The Society has received application from joint owner **SMT. SUPRIYA MEGHASHYAM MALI,** incorporating her single name, as member of the said Society, by deleting the name of the said joint deceased member. Society has also received consent Affidavit from remaining other two legal heirs1) NIMISH MEGHASHYAM MALI (son) 2) YUGANDHAR MEGHASHYAM MALI (son) Duly signed Notarized on 29/12/2025 The Society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimants/ objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/ property of the Society within period of **14 days** from the publication of this notice with copies of such documents and other proofs in support of his/her/ their claims/objection for transfer. Any persons having any claim against the said Flat and /or objection for transmission of the Share Certificate in the names of the said **SMT. SUPRIYA MEGHASHYAM MALI,** are required to make the same known in writing with documentary evidence to the Secretary of the Society at above address within a period of 14 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of their claims/ objections. If no claims/ objections are received within the period prescribed above, the Society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in capital/ property of the Society in such manner as provided under Bye-laws of the Society. The claims/objections, if any received by the Society for transfer of shares and interest of the deceased member in capital/ property of the Society shall be dealt with the manner provided under Bye-laws of the Society. A copy of registered Bye- laws of the Society is available for inspection by claimants/ objectors in the office of the Society between 10 AM to 5 PM from the date of publication of notice, till the date of expiry of its period.

**For and on behalf of**
**RAMA'S TOWER**
**CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD**
**Date: 11/02/2026**
**Place: Mumbai**



**पुणे महानगरपालिका**
**निविदा प्रक्रिया कक्ष**
**निविदा जाहिरात - नवीन कामे**

पुणे महानगरपालिका

१) ई-निविदा विक्री कालावधी :- ११/०२/२०२६ दुपारी २.३० वाजेनंतर ते २०/०२/२०२६ दुपारी २.३० वाजेपर्यंत
२) निविदा स्वीकृती व अंतिम दिनांक व वेळ :- ११/०२/२०२६ दुपारी २.३० वाजेनंतर ते २०/०२/२०२६ दुपारी २.३० वाजेपर्यंत
३) तांत्रिक बाबींचा लिफाफा उघडणे दिनांक :- २३/०२/२०२६ दुपारी ३.०० वाजेनंतर

| अ. क्र. | निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | निविदा संच रुपये | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पी.एम.सी./भवन/ २६४/२०२५-२६ | भवन रचना विभाग | कोथरूड येथील शिवसेना प्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे बालनाटयगृह येथील म्युरल विषयक कामे करणे | ५९३२२०२ | ५९३२२ | ६ महिने (पावसाळा कालावधीसह) | ६०७९ | श्री संग्राम पाटील ८४८३९२२१५३ |
| १. | पी.एम.सी./भवन/ २६५/२०२५-२६ | भवन रचना विभाग | पुणे मनपा प्रशासकीय इमारत येथे फर्निचर, प्लबिंग व तदनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे | ८४४१२६० | ८४४१३ | ६ महिने (पावसाळा कालावधीसह) | ६०७९ | श्री सूरज वाघे ९७३०५७७३३१ |

अ) पुणे मनपाची वरील कामे ही अनुभवी/मनपा मान्यता प्राप्त/ शासन मान्यता प्राप्त ठेकेदाराकडून (कामासाठीच्या पूर्वपात्रता अटी टेंडर सेटमध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ.बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
ड) ऑनलाईन निविदा प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती भवन विभाग पुणेमनपा येथे मिळेल.
इ) कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ(वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

(स्वाक्षरी/-)
**कार्यकारी अभियंता**
**भवन रचना कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**

जाहिरात क्र. २/१६६८ दि. १०/०२/२०२६



**सार्वजनिक सूचना**

याद्वारे सर्वसाधारण जनतेस कळविण्यात येते की, श्रीमती लतिका अनिलकुमार हाटकर व श्रीमती प्रतिमा रत्नदीप कर्णिक, या दिवंगत श्री जयसेन जयंत रेळे यांच्या कन्या व कायदेशीर वारस असून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेच्या सह-मालक आहेत. वरील दोन्ही व्यक्तींच्या स्पष्ट व लेखी संमतीशिवाय खाली नमूद केलेल्या मालमत्तेबाबत कोणतीही हस्तांतरण, विक्री, विकास, बोजा निर्माण करणे किंवा कोणत्याही व्यवहाराची नोंदणी करण्यास त्यांनी स्पष्ट आक्षेप नोंदविला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
मुंबई शहर, गिरगाव, न्यू रोड, फ्रेंच रोड जवळ, कॅडस्ट्रल सर्व्हे क्रमांक 3/1564, डी वॉर्ड क्रमांक 2555(6) येथील सर्व ती जमीन व त्यावर उभारलेली इमारत, जी "शंकर भवन" या नावाने ओळखली जाते.

**आक्षेपाची सूचना**
वरील सह-मालकांनी खालील कोणत्याही बाबीसाठी कोणतीही संमती, अधिकार, परवानगी किंवा मान्यता दिलेली नाही, ती पुढीलप्रमाणे:
कोणतीही विक्री, हस्तांतरण, असाईनमेंट किंवा कन्व्हेयन्स,
कोणताही विकास करार किंवा पुनर्विकास प्रस्ताव,
कोणतेही सामंजस्य करार (MOU) किंवा पावर ऑफ अटर्नी,
कोणताही गहाण, चार्ज किंवा इतर बोजा,
किंवा कोणत्याही दस्तऐवजाची अथवा व्यवहाराची नोंदणी,
सदर मालमत्तेबाबत पूर्णतः किंवा अंशतः.
याद्वारे हेही स्पष्ट करण्यात येते की, वरील सह-मालकांची लेखी व स्पष्ट संमती नसताना कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा विकासकाने केलेला किंवा करण्याचा प्रयत्न केलेला कोणताही व्यवहार हा बेकायदेशीर, शून्य, अवैध (non-est) असून त्याद्वारे कोणताही हक्क, मालकी किंवा स्वारस्य निर्माण होणार नाही.

**सार्वजनिक दक्षता सूचना**
कोणतीही व्यक्ती, विकासक, बांधकाम व्यावसायिक, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था किंवा प्राधिकरण यांनी सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार केल्यास किंवा करण्याचा प्रस्ताव दिल्यास, तो पूर्णतः त्यांच्या स्वतःच्या जोखमीवर असेल व त्याचे सर्व परिणाम त्यांनाच भोगावे लागतील.
सदर सह-मालकांच्या हक्कांना विरोध करणारी कोणतीही तथ्यात्मक किंवा कायदेशीर मांडणी ही कायदेशीरदृष्ट्या अप्रासंगिक व परिणामहीन असून ती वरील सह-मालकांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही.

**सूचना**
ही सार्वजनिक सूचना सर्व संबंधितांना सदर मालमत्तेबाबत अस्तित्वात असलेल्या वाद व आक्षेपाची औपचारिक व संरचनात्मक (constructive) माहिती देण्यासाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**स्वाक्षरी/-**
**ॲड. मिहीर रा. गोविलकर**
**(श्रीमती लतिका अनिलकुमार हाटकर व श्रीमती प्रतिमा रत्नदीप कर्णिक यांचे वकील)**

**मुंबई**
**दिनांक :11th फेब्रुवारी 2026**

## इस्त्रोने चंद्रावर उतरण्याची जागा निश्चित केली



**नवी दिल्ली -** चांद्रयान-४ मोहिमेला दोन वर्षांचा अवधी बाकी असतानाच भारतीय अंतराळ संस्था अर्थात इस्त्रोने दक्षिण ध्रुवीय भागात लँडर उतरवण्यासाठी जागा निश्चित करून मोठे यश मिळवले. भारताची ही आजवरची सर्वात गुंतागुंतीची चांद्रमोहीम असणार आहे. इस्त्रोच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, चंद्रावरील टेकड्यांच्या चार ठिकाणांपैकी एक ठिकाण आम्हाला लँडर उतरवण्यासाठी योग्य असल्याचे आढळून आले. जी चार ठिकाणे आम्ही निश्चित केली त्यात एम-१, एम-३, एम-४, व एम-५ यांचा समावेश आहे. त्यातील एम-४ हे ठिकाण लँडरसाठी निवडण्यात आले. चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय भागातील या चार ठिकाणांचे उच्च दर्जाच्या कॅमेऱ्यातून विविध प्रकारचे फोटो मिळवण्यात आले. त्यानंतर त्याचे अध्ययन केल्यावर असे आढळले की, एम-४ हे ठिकाण इतर ठिकाणांच्या तुलनेत अधिक सुरक्षित आहे. त्यामुळेच या ठिकाणाची निश्चिती करण्यात आली. सुमारे २१०४ कोटी रुपयांची ही मोहीम असून, चंद्राच्या पृष्ठभागावरील खडक व मातीचे नमुने घेऊन ते परतेल. त्यासाठी या मोहिमेत दोन स्वतंत्र रॉकेटचा वापर करण्यात येणार आहे.

# चीनविरुद्ध हाँगकाँगमध्ये आवाज उठवला

## ७८ वर्षांच्या वर्तमानपत्र मालकाला २० वर्षे कैद

■ हाँगकाँग

**हाँगकाँगमधील लोकशाही समर्थक वर्तमानपत्र मालकाल आणि बीजिंगचे तीव्र टीकाकार जिमी लाई यांना चीनने लागू केलेल्या राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत आतापर्यंतची सर्वात मोठी २० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली.**


७८ **वर्षीय** लाई यांना डिसेंबरमध्ये परदेशी शक्तींशी संगनमत करून राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण केल्याचा आणि भडकाऊ लेख प्रकाशित करण्याच्या कटाच्या आरोपाबाबत दोषी ठरवण्यात आले. या गुन्ह्यांसाठी कमाल शिक्षा जन्मठेप होती. लाई यांचे सहकारी पल डेली यांच्यासह त्यांच्या वृत्तपत्राचे सहा माजी कर्मचारी आणि दोन कार्यकर्ते यांनाही संगनमताशी संबंधित आरोपांवर ६ वर्षे ३ महिने ते १० वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा झाली. शिक्षा सुनावण्यासाठी न्यायालयात पोहोचताना लाई समर्थकांकडे पाहत हसत हात हलवताना दिसले. मात्र न्यायालयातून बाहेर पडताना ते गंभीर दिसत होते, तर गॅलरीतील काही लोक रडत होते. लोकशाही समर्थक लाई यांच्या अटकेने आणि खटल्याने हाँगकाँगमधील प्रेस स्वातंत्र्यावर गदा आणली आहे. सरकारने मात्र हा खटला मुक्त पत्रकारितेशी संबंधित नसल्याचे सांगत आरोपींनी पत्रकार असल्याचा बहाणा करून चीन आणि हाँगकाँगला हानी पोहोचवणारी कृत्ये केल्याचा आरोप केला आहे.



लाई यांच्या शिक्षेमुळे बीजिंग आणि परदेशी सरकारांमधील राजनैतिक तणाव वाढू शकतो. त्यांच्या दोषसिद्धीवर अमेरिका आणि ब्रिटनने टीका केली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एप्रिलमध्ये चीन दौऱ्यावर जाण्याची शक्यता आहे. त्यांनी लाई यांच्या परिस्थितीबद्दल खेद व्यक्त करत चीनचे नेते शी जिनपिंग यांच्याशी बोलून त्यांच्या सुटकेचा विचार करण्याची विनंती केल्याचे म्हटले आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या सरकारने ब्रिटिश नागरिक असलेल्या लाई यांच्या सुटकेची मागणी केली आहे. लाई यांचा मुलगा सेबॅस्टियन यांनी ही कठोर शिक्षा कुटुंबासाठी धक्कादायक आणि वडिलांच्या जीवाला धोकादायक असल्याचे म्हटले. यातून हाँगकाँगच्या न्यायव्यवस्थेचा पूर्ण ऱ्हास आणि न्यायाचा अंत दिसतो, असे त्यांनी म्हटले आहे.

# नरवणेंचे पुस्तक प्रकाशित नाही

## प्रकाशक पेंग्विन कंपनीचा दावा




■ नवी दिल्ली

**लोकसभेतील** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेत दाखवलेल्या माजी लष्करप्रमुख जनरल एम. एम. नरवणे यांच्या 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' या पुस्तकाबाबत प्रकाशन संस्था पेंग्विन रँडम हाऊस इंडिया यांनी स्पष्ट निवेदन जारी केले आहे. पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने स्पष्ट केले आहे की, हे पुस्तक अद्याप प्रकाशित झालेले नाही. पुस्तकाच्या प्रकाशनाचे सर्व हक्क आमच्याकडे असून, कोणतीही छापील किंवा डिजिटल प्रत अधिकृत सार्वजनिक करण्यात आलेली नाही.

कंपनीने हे स्पष्टीकरण पुस्तकाच्या अनधिकृत प्रती लीक झाल्याच्या आणि ऑनलाईन प्रसारित झाल्याच्या दाव्यांनंतर दिले आहे. याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे व अप्रकाशित आणि मंजुरी न मिळालेला मजकूर सार्वजनिक कसा झाला याचा तपास सुरू आहे. राहुल गांधी यांनी लोकसभेत २ आणि ३ फेब्रुवारी रोजी या पुस्तकातून मजकूर वाचण्याचा प्रयत्न केला. मात्र

### दिल्ली पोलिसांत गुन्हा दाखल

पुस्तक प्रकाशित नसल्याने ते वाचण्यास बंदी घालण्यात आली. त्यानंतर एका मासिकात छापलेला या संबंधीचा लेख वाचण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. त्यांनी दावा केला होता की, त्या लेखात नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील काही भाग आहेत. मात्र लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी यालाही परवानगी दिली नाही. ४ फेब्रुवारी रोजी राहुल गांधी पुस्तकाची छापील प्रत घेऊनच संसदेत आले आणि आज पंतप्रधान आले तर मी त्यांना हे पुस्तक देईन, असे त्यांनी सांगितले. त्यांनी पुस्तकातील एक पान उघडून दाखवत, त्यात पंतप्रधानांनी लष्करप्रमुखांना जे योग्य वाटेल पान ७ वर

# पाकिस्तान क्रिकेट बोर्ड झुकले

## भारत-पाक सामना होणार

■ नवी दिल्ली

**टी-२०** वर्ल्ड कप सुरू होण्याआधी भारताविरुद्ध सामना खेळणार नसल्याची घोषणा करून खळबळ उडवणारे पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) अखेर झुकले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेशी (आयसीसी) काल झालेल्या दीर्घ चर्चेनंतर पाकिस्तानने आपली भूमिका बदलली असून, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील प्राथमिक फेरीचा सामना रविवारी १५ फेब्रुवारी रोजी ठरल्याप्रमाणे श्रीलंकेतील कोलंबो येथे होणार आहे. टी-२० वर्ल्ड कपमधून माघार घेणाऱ्या बांगलादेश क्रिकेट बोर्डाला पाठिंबा देण्यासाठी पीसीबीने याआधी पाकिस्तान सरकारच्या निर्देशांनुसार भारताविरुद्धचा सामना न खेळण्याचा निर्णय घेतला होता. मात्र आयसीसीकडून संभाव्य आर्थिक दंड आणि अन्य परिणामांची माहिती दिल्यानंतर पीसीबीची भूमिका बदलली. आयसीसीचे प्रतिनिधी इमरान ख्वाजा आणि मुबाशिर उस्मानी यांनी लाहोरमध्ये पीसीबी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीला बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष अमीनुल इस्लाम बुलबुल देखील उपस्थित होते. याशिवाय श्रीलंका, बांग्लादेश आणि अमिरात क्रिकेट बोर्डांनीही पाकिस्तानला सामना खेळण्याचे आवाहन केले होते.

# अजितदादांच्या शेवटच्या सभेतील उमेदवार विजयी

■ खेड

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार यांनी खेड तालुक्यात ज्यांच्यासाठी शेवटची सभा घेतली होती, ते उमेदवार शरद बुट्टे पाटील हे जिल्हा परिषद निवडणुकीत विजयी झाले आहेत. भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष असलेल्या शरद बुट्टे पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केला होता आणि त्यांच्या विजयासाठी अजित पवार यांनी विशेष प्रयत्न केले होते. पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील वराळे येथे अजित पवार यांनी शेवटची सभा घेतली. या सभेत त्यांनी जाहीर केलेल्या शरद बुट्टे पाटील या जिल्हा परिषद उमेदवाराचा विजय झाला आहे. शरद बुट्टे पाटील यांचा ३९९ मतांनी विजय झाला आहे. विशेष म्हणजे याच शेवटच्या सभेत अजित पवार यांनी 'राजकारण लई वंगाळ असतं' अशी टिप्पणी करत कार्यकर्त्यांना सावध राहण्याचा सल्ला दिला होता.

# महाशिवरात्रीसाठी कोकण रेल्वे मार्गावर ६ विशेष गाड्या

■ मुंबई

**महाशिवरात्रीला** कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची होणारी अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेच्या समन्वयाने कोकण रेल्वेवर ६ विशेष ट्रेन चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ट्रेन क्रमांक ०११२९/०११३० मुंबई सीएसएमटी - सावंतवाडी रोड- सीएसएमटी विशेष ट्रेन चालवली जाणार आहे. यापैकी ट्रेन क्रमांक ०११२९ मुंबई सीएसएमटी - सावंतवाडी रोड विशेष ट्रेन शनिवार १४ फेब्रुवारी, गुरुवार १९ फेब्रुवारी आणि शनिवार २१ फेब्रुवारी रोजी मुंबई सीएसएमटीहून रात्री १२ वाजून २० मिनिटांनी सुटेल. ही ट्रेन त्याच दिवशी दुपारी १२ वाजून ३० मिनिटांनी सावंतवाडी रोडला पोहोचेल. ट्रेन क्रमांक ०११३० सावंतवाडी रोड - मुंबई सीएसएमटी विशेष ट्रेन शानिवार १४ फेब्रुवारी, गुरुवार १९ फेब्रुवारी आणि शनिवार २१ फेब्रुवारी रोजी सावंतवाडी रोडवरून सायंकाळी ५ वाजून २० मिनिटांनी सुटेल. ही गाडी दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजून ५ मिनिटांनी मुंबई सीएसएमटीला पोहोचेल.

# युथ फेस्टिव्हलवरून वाद उफाळला

## केरळमध्ये कुलगुरुंविरोधात निदर्शने

■ तिरुवनंतपूरम

**विद्यार्थी** संघटनेला वार्षिक युवक महोत्सव आयोजित करण्याची परवानगी द्यावी आणि यासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करावा. यासाठी आज येथील केरळ विद्यापीठात स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय )च्या नेतृत्वाखाली कुलगुरू मोहनन कुन्नुम्मल यांच्या विरोधात मोर्चा काढण्यात आला. यावेळी पोलीस आणि मोर्चातील विद्यार्थ्यांमध्ये संघर्ष उडाला. मोर्चाला पांगवण्यासाठी पोलिसांनी निदर्शकांवर पाण्याचा मारा केला.



कुन्नुम्मल यांनी एसएफआय संघटनेला महोत्सव आयोजित करण्यास मनाई केल्यानंतर हे आंदोलन सुरू झाले. यावर्षीचा युथ फेस्टिव्हल झाला असून, एका वर्षी दोन युथ फेस्टिव्हल नको, अशी प्रभारी कुलगुरू मोहनन कुन्नुम्मल यांची भूमिका आहे, तर आधीचा युथ फेस्टिव्हल हा गेल्या वर्षी झाला होता, असे एसएफआयचे म्हणणे आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींनी फोन करून पवारांच्या तब्येतीची विचारपूस केली

■ पुणे

**ज्येष्ठ** नेते शरद पवार यांना श्वास घेण्यात त्रास होत असल्याने काल दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल केले. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी फोन केला. पंतप्रधानांनी पवार यांच्या तब्येतीबाबत सविस्तर चौकशी करत लवकर बरे होण्याच्या शुभेच्छा दिल्या. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही आज फोन करून शरद पवारांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

दरम्यान, शरद पवार यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. त्यांची प्रकृती सध्या स्थिर असून उपचारांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे त्यांना होत असलेला त्रास आता काही प्रमाणात कमी झालेला आहे, अशी माहिती डॉक्टर सायमन ग्रँट यांनी दिली. रुग्णालयाच्या प्रोटोकॉलनुसार शरद पवारांवर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

# खासदार सुप्रिया सुळे यांच्या लेकीचे लग्न

## देवेंद्र फडणवीस-गडकरींनी ठरवले

■ बारामती

**शरद पवार** गटाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि सदानंद सुळे यांची कन्या रेवती लवकरच विवाह बंधनात अडकणार आहे. रेवतीचा विवाह नागपूरचे प्रसिद्ध उद्योगपती अरुण लखानी यांचे पुत्र सारंग लखानी याच्यासोबत होणार आहे. ही माहिती माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या कन्या स्मृती शिंदे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून दिली. विशेष म्हणजे, रेवती सुळेचा विवाह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मध्यस्थीने ठरला आहे.



सारंग लखानी हा नागपूरचा रहिवासी आहे. तो विश्वराज ग्रुपचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अरुण लखानी यांचा पुत्र असून, तो एक उत्तम बॅडमिंटनपटू आहे. त्याने विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे. विश्वराज ग्रुप ऊर्जा प्रकल्पांना पाणी व सांडपाणी पुरवठा करण्याच्या तसेच रिअल इस्टेट क्षेत्रात कार्यरत आहे. रेवती हिचादेखील व्यवसाय आहे. तिने ऑगस्ट २०२५ मध्ये वडील सदानंद सुळे यांच्यासोबत स्नायपर स्पोर्ट्स या क्रीडा क्षेत्रातील कंपनीची स्थापना केली होती.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# वांगचुक यांची प्रकृती उत्तम

## केंद्र सरकारची कोर्टात माहिती

■ नवी दिल्ली

**लडाखचे** पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचूक यांची प्रकृती उत्तम असून, त्यांच्यावर जोधपूर येथील एम्समध्ये उपचार सुरू आहेत, अशी माहिती केंद्र सरकारकडून सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आली.

वांगचूक हे मागील वर्षीच्या सप्टेंबरपासून राजस्थानच्या जोधपूर येथील तुरुंगात आहेत. वांगचूक यांच्या पत्नीने त्यांच्या सुटकेसाठी दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्या. अरविंद कुमार व न्या. पी.बी. वराळे यांनी अतिरिक्त सॉलिसीटर जनरल के. एम. नटराज यांना वांगचूक यांच्यावरील उपचारांविषयी विचारले. न्या. पी. बी. वराळे म्हणाले की, त्यांच्या प्रकृतीची गडबड आहे याचा तुम्ही थेट इन्कार करत नाही म्हणजे काहीतरी नक्की आहे. वांगचूक हे सातत्याने आपल्या प्रकृतीबाबत तक्रार करत आहेत आणि डॉक्टरांचेही तसेच म्हणणे आहे. आता त्यांच्यावर उपचार सुरू आहेत म्हणजे त्यांच्या प्रकृतीचा मुद्दा आहेच म्हणूनच आम्ही निर्देश दिले होते. त्यावर स्पष्टीकरण देताना सॉलिसीटर नटराज म्हणाले की, जोधपूरच्या एम्समध्ये वांगचूक यांच्यावर उत्तम उपचार सुरू आहेत व त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता उद्या होणार आहे.

# दादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही!

## पदभार स्वीकारताच सुनेत्रा पवारांची पोस्ट

■ मुंबई

**राज्याच्या** पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांनी आज आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. ३१ जानेवारी रोजी त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर आज त्या पहिल्यांदाच मंत्रालयात आल्या. पदभार स्वीकारल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही, पण त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि अधिक सक्षम महाराष्ट्र घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी नक्की करेन, अशी भावूक एक्स पोस्ट केली.

कार्यभार स्वीकारण्यापूर्वी सकाळी सुनेत्रा पवार यांनी मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरात गणपतीचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी दादर येथील चैत्यभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. पान ७ वर



# माथाडी नेते नरेंद्र पाटलांच्या पत्नीचा धक्कादायक पराभव

■ ढेबेवाडी

**पाटण** तालुक्यातील ढेबेवाडी खोऱ्यातील जिल्हा परिषदेच्या मंद्रुळ कोळे गटात अवघ्या २२ वर्षांच्या मृणाल पाटील यांनी दणदणीत विजय मिळवला. बांधकाम व्यावसायिक महेश पाटील यांची कन्या असलेल्या मृणाल पाटील यांनी भाजपाचे नेते व माथाडी कामगार नेते नरेंद्र पाटील यांच्या पत्नी प्राची पाटील यांचा १०१९ मतांनी धक्कादायक पराभव केला.

प्राची पाटील यांचा पराभव करून मृणाल पाटील जाएंट किलर ठरल्या आहेत. भाजपाचे नेते व माथाडी कामगार नेते नरेंद्र पाटील यांच्या पत्नी प्राची पाटील निवडणुकीच्या रिंगणात होत्या. त्यांनी जिल्हा परिषदेत पाऊल ठेवावे, यासाठी नरेंद्र पाटील यांनी प्रचंड शक्ती पणाला लावली. त्यांनी आपल्या पत्नीच्या प्रचारासाठी एका मंत्र्याला आमंत्रित केले होते. या सभेत मंत्री महाशयांनी शिवसेना नेते शंभूराज देसाई यांच्यावर एकेरी शब्दात केलेली टीका काही प्रमाणात प्राची पाटील यांच्या पराभवाला कारणीभूत असल्याची चर्चा या भागातील नागरिकांत सुरू आहे. तसेच या निवडणुकीत युवा मतदार शिवसेनेकडे आकर्षित झाला होता. शिवाय शंभूराज देसाई यांची ताकद आणि पारंपारिक मतदारांच्या साथीच्या जोरावर मृणाल पाटील यांची सरशी झाली.

# बाबरी मशीद अनंतकाळपर्यंत पुन्हा बांधली जाणार नाही!

### आदित्यनाथ यांचे वक्तव्य

■ बाराबंकी

**मुख्यमंत्री** योगी आदित्यनाथ यांनी आज स्पष्ट आणि कडक शब्दांत सांगितले की, कयामतची इच्छा करणाऱ्यांनी आता हे समजून घ्यावे की, आता कोणती कयामत येणार नाही आणि अनंतकाळपर्यंत कधीही बाबरी मशिदीची पुनर्बांधणी होणार नाही. देशात राहायचे असेल तर नियमाने राहायला शिकावे लागेल. कारण कायदा पाळणारे फायदेशीर ठरतील आणि कायदा मोडणाऱ्यांसाठी कोणतीही जागा नाही.

बाराबंकीमध्ये मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, अयोध्येत रामलल्लासाठी मंदिर तिथेच बांधले गेले असून, ते



कायमस्वरूपी राहील. जे लोक बाबरी मशिदीच्या पुनर्निर्माणाचे स्वप्न पाहत आहेत, त्यांचे स्वप्न कधीही पूर्ण होणार नाही. २०१७ पूर्वी राज्यातील परिस्थिती अशी होती की, प्रत्येक चौथ्या दिवशी शहरांमध्ये कर्फ्यू लावावा लागत होता आणि सण-उत्सव शांततेत साजरे करता येत नव्हते, पण आता राज्यातील अराजकता संपली असून, विकासाला नवी गती मिळाली आहे. राज्यात १ कोटी १६ लाख कुटुंबांना दरवर्षी पेन्शन दिली जात आहे, १५ ते १६ कोटी लोकांना मोफत रेशन मिळत आहे. ५ कोटी ४६ लाख लोकांना आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आरोग्य कार्ड उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

# भाजपा खासदार नारायण राणे जसलोक रुग्णालयात दाखल

■ मुंबई

**भाजपाचे** नेते नारायण राणे यांना जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हृदयाशी संबंधित उपचारासाठी त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. प्रकृती अस्वस्थामुळे नारायण राणे यांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांच्या प्रक्रियेत सहभागी झाले नव्हते आणि निवृत्तीचे संकेत दिले होते.

स्थानिक नगरपंचायतीच्या निवडणुकांमध्ये भाजपाने मिळवलेल्या यशानंतर नारायण राणे यांचा कणकवलीत सत्कार समारंभ ठेवण्यात आला होता. त्यावेळी त्यांनी केलेल्या भाषणात आता मी थकलो आहे आणि किती करणार याला काही मर्यादा असाव्यात अशा आशयाचे वक्तव्य केले होते. त्यानंतर नारायण राणे यांनी आपली दोन्ही मुले कर्तृत्ववान असून, त्यांच्या क्षेत्रात यशस्वी असल्याचे म्हटले होते.

# मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार

## कुकींनी नागांची घरे जाळली

■ इम्फाळ

**ईशान्येकडील** मणिपूर राज्यात पुन्हा हिंसाचार उफाळून आला आहे. उखरूल जिल्ह्यातील लिटांग सराईखोंग गावात कुकी जमातीतील हत्यारबंद हल्लेखोरांनी थांगकुल नागा जमातीतील लोकांच्या घरांना आगी लावल्या. गावकऱ्यांवर दहशत बसवण्यासाठी हवेत बंदुकांच्या असंख्य फैरीही झाडल्या.

या हल्ल्यामुळे गावकऱ्यांची भीतीने गाळण उडाली. अनेक जण घरातील आवश्यक सामान घेऊन शेजारच्या कांगपोकपी जिल्ह्यात पळून गेले. याठिकाणी शनिवारी रात्री लिटान गावातील थांगकुल नागा जमातीतील एका तरुणाला ७-८ जणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केली. मात्र लिटान सराईखोंग गावाच्या प्रमुखाने मध्यस्थी करून हा वाद मिटवला होता. वादावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी बैठक घेण्याचे ठरले होते. परंतु ती बैठक झालीच नाही. मात्र शेजारच्या सिकिबंग गावातून आलेल्या



हत्यारबंद टोळक्याने लिटान सराईखोंगवर अचानक हल्ला चढवला. त्यामुळे आता पुन्हा एकदा हिंसाचाराला सुरुवात झाली आहे. लिटान सराईखोंग गावात तणावाचे वातावरण आहे. थांगकुल नागा ही मणिपूरमधील सर्वात मोठी नागा जमात आहे. मणिपूरचे उपमुख्यमंत्री एल डिखो हे तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी गावकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला.